# माध्यम

२० अप्रैल ६८ । ५० पैसे

*Like an idea whose time has come, not even the marching of mighty armies can halt us. We are moving to the land of freedom. Let us march to the realization of the American dream. Let us march on segregated housing. Let us march on segregated schools. Let us march on poverty. Let us march on ballot boxes, march on ballot boxes until race baiters disappear from the political arena, until the Wallaces of our nation tremble away in silence. My people, my people, listen! The battle is in our hands.*

*—Dr. Martin Luther King*



DRAWING BY

DRAWING

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : सत्तेचाळिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. एप्रिल, ११

'माणूस' दिनांक ६ एप्रिलमधील श्री. वि. ग. कानिटकर यांचा 'अन्न स्वतंत्रता संचलना' च्या उपक्रमाबद्दलचा लेख वाचला. विशेषतः वृत्तपत्रामधील संचलनाचे प्रसिद्धी स्थान पाहून अत्यंत वाईट वाटले. परंतु पवित्र कार्याला वृत्तपत्रीय जाहिरातवजा प्रसिद्धीची आवश्यकता ती काय? लोकमान्य टिळकांबरोबरच वृत्तपत्रीय वृत्ती लोप पावली. संचलनात सहभागी होण्याची मनापासून इच्छा असतानासुद्धा सहभागी होता आले नाही, परंतु त्याबद्दल दुःख न करता पुढील कार्यात सहभागी होणारच आहे. **रवीन्द्र डांगे** (अन्धेरी)

स. न. एप्रिल, ९

परदेशी धान्य भारतात येऊ न देण्यासाठी आपण हाती घेतलेला 'अन्न स्वतंत्रता संचलन' हा उपक्रम स्तुत्य. अभिनंदन. ६ एप्रिलच्या अंकातील 'रजनी मी चुकलो' ही प्रभाकर मुळे यांची कथा आवडली; तसेच 'महापालिकेची निवडणूक' हा सदाशिव पेठकरांचा लेखही चांगला वाटला.

**श्रीकांत लिमये**, (वांद्रे)

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# प्रतिपच्चंद्ररेखेव

# १

अंतर बरेच असूनही उत्साहात पार पडलेला प्रवास म्हणजे नासिक ते वेल्होळी.

निरोप द्यायला आलेली नासिकची मंडळी मैल दोन मैल बरोबर होती.


मराठवाड्यात संचलनासोबत असलेले दोन कार्यकर्ते येथे पुन्हा आमच्यात मिसळले. मनोहर टाकसाळ आणि गंगाधर नलावडे. तिकडचे नवे जुने ऐकण्यात काही वेळ गेला.

डावीकडे पांडव लेणी दिसत होती. कुणीतरी दोन वर्षांपूर्वी या ठिकाणी घडलेल्या एका भीषण प्रसंगाची माहिती सांगत होता. सैन्यातल्या एका अधिकाऱ्याने गोळ्या झाडून सर्व कुटुंबासहित येथे आत्महत्या केलेली होती. एक मुलगी फक्त घाबरून पळाली, ती तेवढी या हत्याकांडातून बचावली. त्या अधिकाऱ्याला कर्जामुळे जिणे असह्य झाले होते म्हणे ! तरीपण माणूस इतका क्रूर आणि बेमान कसा होऊ शकतो हे एक न उलगडलेले कोडेच राहिले.

विनायक पाटलांच्या रसवंतीला बहर आला होता. दादा कोंडकेच आख्खाच्या आख्खा त्यांच्या अंगात संचारल्यासारखे ते बोलत होते.

मध्येच त्यांनी विचारले, 'काय हो ! ते ' यथा काष्ठं च काष्ठं च काय भानगड आहे ? '

साहित्य प्रांतातला एखादा वेगळा संदर्भ कोणाच्याही बोलण्यात आला, तर लगेच त्यामागील तपशील विचारून, तो स्मृतीत साठवून ठेवण्याची पाटलांची लकब माझ्या केव्हाच ध्यानात आली होती.



'वेल्होळी'चे ग्रामस्थ व अन्न स्वतंत्रता संचलन सैनिक


या श्लोकार्धाचा अर्थ योगायोगाने मला माहीत होता. त्यातला वेदांत मी पाटलांना सांगितला आणि माडगुळकरांच्या सुप्रसिद्ध 'दैव जात' मधल्या समानार्थाच्या ओळीही म्हणून दाखवल्या

दोन ओंडक्यांची होते सागरात भेट
एक लाट तोडी दोघा, पुन्हा नाही गाठ
क्षणिक तेवी आहे बाळा, मेळ माणसांचा

पराधीन आहे जगति पुत्र मानवाचा।

मोकाशींनी यावर एकदम वा! वा! म्हटले. हा वेदांतविचार त्यांच्या तटस्थ-वृत्तीला भलताच मानवला असला पाहिजे. कारण अशी उत्स्फूर्त दाद देण्याची उथळ भडक चाल त्यांच्या साहित्यिक घराण्यात सहसा आढळत नाही.

पाटलांनी कडी केली – "बरं झालं ही भानगड समजली. नाहीतर एखाद्या सभेत मी 'काष्टं च काष्टं च' चा संबंध काठाकाठाने जाण्याशी नाहीतर धोतराच्या काष्टयाशी लावला असता आणि तुम्हा मंडळीची धमाल करमणूक झाली असती."



खुलताबादच्या सभेत श्री. गंगाधर नलावडे

एक वरिष्ठ सरकारी अधिकारी काही वेळ आमच्यात होते. त्यांच्या पत्नीही त्यांच्या सोबत होत्या. घरच्या बागेतील शेंगांचे दाणे भाजून सोलून त्यांनी आमच्यासाठी आणले होते. 'घरगुती काजू'चा हा बहुमोल ऐवज मोकाशी उत्तम तऱ्हेने सांभाळत होते. त्यांना अशा कामांची पहिल्यापासून आवड. मोकाशींनी अशा ऐवजाच्या पिशव्या खांद्यावर आवडीने सांभाळाव्यात आणि आम्ही लहर लागेल तेव्हा आमचे मोकळे हात त्यात घालावे, ही श्रमविभागणी सर्वांनाच फार सोईची वाटत होती.

या सरकारी अधिकाऱ्यांनी एक प्रामाणिक प्रश्न विचारला –

'तुम्ही ११ गावांचा परान्नमुक्ती संकल्प केला हे चांगले आहे. खेड्यांसाठी हा किंवा अशा स्वरूपाचे कार्यक्रम चालू शकतील. पण शहरातील आमच्यासारख्या सर्वसामान्य माणसालाही या आंदोलनासंबंधी काही करावस वाटतं. त्याने कशा तऱ्हेने सहभागी व्हायचं !'

अगदी चटकन् सुचणारं उत्तर 'दहा टक्के तूट कमी अन्न खाऊन भरून काढावी. असं देता आलं असतं. भारत-पाक युद्धाच्या वेळी शास्त्रीजींनी ते दिलंही होतं. अनेकांनी ते त्या वेळी मानलही होतं. पण अन्न स्वतंत्रता संचलनाने घेतलेली भूमिका थोडी वेगळी आहे.

**संचलनाचा असा दावा आहे, की सरकारी व खाजगी नासधूस थांबवली, वाटप व्यवस्था सुधारली, साठेबाजीला आळा घातला, चोरटी निर्यात बंद केली, सर्व देश अन्नधान्याच्या बाबतीत एक घटक आहे असे गृहीत धरून वितरणव्यवस्था आखली तर आज भासते आहे ती तूट बहुतांश भरून निघेल.**

आणि ही सर्व उपाययोजना अंमलात आणल्यावरही थोडीफार तूट शिल्लक राहणार असेल तर हा उपासतापासाचा, कमी अन्न खाण्याचा सल्ला लोकांना दिला जावा. आज सर्वत्र उधळपट्टी आणि गैरव्यवस्था यांचे साम्राज्य चहूबाजूला पसरले असता लोकांना अन्नत्यागाचे आवाहन करणे प्रश्न न समजल्याचे लक्षण आहे. उपाययोजना करण्याची बौद्धिक व व्यवस्थापकीय शक्ती नसल्याची कबुली आहे. जबाबदारी टाळण्याची वृत्तीच यातून वाढण्याचाही धोका आहे.

शिवाय त्यागाची आवाहने वरचेवर करून बोथट होतात याचा अनुभव गेल्या वीस वर्षांत आपण वारंवार घेतलेला नाही काय ?

आज गरज आहे वेगळ्या प्रेरणांची. त्यागाऐवजी अभ्युदयाची आकांक्षा प्रज्वलित करण्याची ही वेळ आहे. निदान अन्नस्वतंत्रता संचलनाने अशी भूमिका प्रथमपासून घेतलेली आहे. अगदी नाइलाज झाला तरच त्यागाचे समर्थन. पहिले आवाहन पुरुषार्थाचे.

वेरूळनंतरच्या पहिल्याच सभेत हे आवाहन अचूक उचलले गेल्याचे प्रत्यंतर आले होते. खुलदाबादच्या सभेत प्रास्ताविक भाषण करताना एक स्थानिक कार्यकर्ते श्री. गंगाधर नलावडे यांनी सांगितले होते—

'आपल्याला स्वतंत्र होऊन वीस वर्षे उलटली. एव्हाना आपल्याला पंख फुटून आपण आकाशात उंच भरारी मारायला हवे होते. पण अजून आपण घरट्यातच बसून आहोत. आपण भीती सोडून, झेप घ्यायला तयार व्हावे हा या आंदोलना-मागील मला तरी समजलेला विचार आहे.'

श्री. नलावडे वेरूळला दूर उभे राहून कार्यक्रम पाहात होते. वेरूळ ते खुलताबाद ते आमच्यासोबत चालले. पण तेवढ्यावरून त्यांना आंदोलनामागची प्रेरणा नेमकी हेरता आली.

भल्याभल्यांनी पुढे आंदोलनाचे वेगवेगळे अर्थ लावलेले पाहिल्यावर तर ही एका ग्रामीण विभागात काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याची समज विशेष उठून दिसली.

हे श्री. नलावडे आज रात्रीच्या वेल्होळीच्या सभेतही भाषण करणार होते. ◻

**—श्री. ग. मा.**

# परिपत्रके आणि प्रवचने यांचा सुकाळ

देशात वारंवार उद्भवणाऱ्या जातीय दंगलींनी केंद्र सरकार व्यथितचित्त झालेले दिसते. दहा-पंधरा दिवसांपूर्वी केंद्रीय गृह खात्याने सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना एक परिपत्रक धाडून जातीय दंगलींना प्रोत्साहन देणाऱ्या शक्तींचा कडक बंदोबस्त करा असा आदेश दिलेला आहे. वस्तुतः जातीय काय किंवा अन्य कोणत्याही प्रकारची काय, दंगल उद्भवल्यानंतर तिचा बंदोबस्त करणे हे शासन संस्थेचे कर्तव्यच आहे. आपल्या घटनेप्रमाणे राज्यातील शांतता आणि सुव्यवस्था यांचे रक्षण करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. असे असताना, केंद्र सरकारला मुद्दाम परिपत्रक काढून राज्यसरकारांना या कर्तव्याची जाणीव करून देण्याची गरज भासते यावरून ही जबाबदारी राज्य सरकारे नीट पार पाडीत नाहीत याचीच कबुली मिळते.

अर्थात, केंद्र सरकारने आपल्या परिपत्रकात काही नवीन उपाय सुचविले आहेत असेही नव्हे. ते परिपत्रक म्हणजे नेहमी कानांवर पडणारे प्रवचन आहे. दंगलखोरांना क्षमा न करता त्यांना त्यांच्या पापाबद्दल शासन मिळालेच पाहिजे एवढे एक सूत्र डोळ्यांपुढे ठेवून या परिपत्रकाची रचना करण्यात आली आहे. यामुळे मनात प्रश्न असा निर्माण होतो की, केवळ प्रवचनवजा परिपत्रक काढून जातीय दंगलींना आवर बसेल किंवा त्याबाबतचे आपले कर्तव्य संपले असेच केंद्र सरकार मानत आहे का ? केवळ प्रवचनांनी प्रश्न सुटत असते तर मग आपल्या देशात कोणताच प्रश्न शिल्लक राहिला नसता. आपल्या देशात प्रवचनकारांची कधीच उणीव भासलेली नाही. विशेषतः, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर कोणी काय करावे यासंबंधीची मंत्र्यांची प्रवचने ऐकून नागरिकांना वीट आलेला आहे.

हे असे का होत आहे, याचा कधी राजकर्त्यांनी फारसा विचार केला आहे असे दिसत नाही. कारण तसा विचार झाला असता तर त्यांनी आपल्या तोंडाला कुलुप लावून आपल्या प्रवचनाप्रमाणे वर्तन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असता. मंत्र्यांची प्रवचने केवळ रटाळ असतात म्हणूनच त्यांची उपेक्षा होत असते असे नव्हे; ही प्रवचने इतरांसाठी आहेत आपला त्याच्याशी काहीही संबंध नाही, अशीच मंत्र्यांची धारणा असावी. लोकांनी काय करावे हे सांगण्याचा मंत्र्यांना एवढा सोस असतो की त्या भरात आपण कसे वागायचे असते याचा विचार करायला त्यांना फुरसतच सापडत नाही.

लोकांनी कायदा पाळावा असे आवर्जून सांगणाऱ्या मंत्र्यांनी ' फेडको ' प्रकल्पा-

सारखी उघड उघड न्यायालयाचा अवमान करणारी प्रकरणं घडवून आणली तरी त्या-बद्दल लोकांनी ब्र उच्चारू नये अशीच सरकारची अपेक्षा असते. तसे नसते तर एवढे गंभीर प्रकरण विधानसभेमध्ये चर्चिले जात असताना त्याची गंभीर दखल घेण्याची आणि त्याबाबत नमके काय घडले याबद्दल जनतेला विश्वासात घेऊन खुलासा करण्याची संबंधितांना गरज वाटली असती. लोकांनी निस्पृह राहावे, असे सांगणाऱ्या मंत्र्यांचे हात कोणच्या व्यवहारात किती बरबटलेले असतात, हे लोकांना माहीत असते. केवळ आरोप सिद्ध करता येत नाहीत, म्हणून ते आरोप अस्तित्वातच नाहीत असे मानण्याने एक वेळ स्वतःचे समाधान करता येत असेल; परंतु त्यामुळे लोक-मानसातील शंकाकुशंकांना आवर बसत नाही, हे आपल्या राज्यकर्त्यांनी ध्यानात घेतले तर मग आपली प्रवचने ही पालथ्या घड्यावरच्या पाण्याप्रमाणे वाया का जातात, हे त्यांच्या ध्यानी येईल. मध्यमवर्गातील एखादा राजकीय कार्यकर्ता मंत्रिपदाची आठ–दहा वर्षे उपभोगल्यानंतर चित्रपटगृहांपासून पेट्रोलपंपांपर्यंत अनेक धनदायी उद्योगधंद्यांतील बडे प्रस्थ झालेले असते, हा अनुभव प्रत्येक राज्यात कमीजास्त प्रमाणात पाहावयास मिळतो. आपल्या गटातील व्यक्तीने सरकारी आयात–निर्यात निर्बंधांचा गैरवापर करून अमाप पैसा जमा केल्यानंतर व त्या बाबतीत गुप्तचर विभागाने त्या व्यक्तीवर खटला भरावा, अशी शिफारस केल्या-नंतरही हे प्रकरण न्यायासनासमोर येऊ नये, यासाठी किती खटपटी–लटपटी केल्या जातात, याच्या अनेक सुरस आणि चमत्कारिक कथा उद्योगमंत्रालयाभोवती घुट-मळणाऱ्यांकडून सहज ऐकावयास मिळतात.

## जातियतेचा भस्मासुर

जी गोष्ट आर्थिक व्यवहारांची तीच जातीयतेला प्रोत्साहन देणाऱ्या प्रवृत्तींची जातीयवाद हा भारतीय राष्ट्रवादाला जडलेला दुर्धर कर्करोग आहे आणि या रोगाचे मूळ नष्ट करण्यासाठी अतिशय गंभीर स्वरूपाची शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे, याबद्दल कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु हे घडावे कसे, हा खरा प्रश्न आहे. याचे कारण असे आहे की, जातीयतेला शिव्याशाप देणारे कार्यकर्ते जातीयवादाच्या आसऱ्यानेच सत्तेच्या शिडीवरून सुरक्षित जागी पोचलेले असतात. निवडणुकींचा मोसम आला की, उमेदवारांची निवड करताना जातीय दृष्टीलाच प्राधान्य दिले जाते, ही वस्तुस्थिती आहे. कोणत्या विभागात कोणत्या जातीचा उमेदवार निवडून येईल, याचा अंदाज घेऊनच तिकिटांचे वाटप होते. निवडणुकांचा मोसम संपल्यानंतर मंत्रिमंडळे बनवितानाही हीच दृष्टी डोळ्यांपुढे असते. जिल्हा परिषदेच्या निवडणुकी-पासून लोकसभेच्या निवडणुकीपर्यंतचे सर्व राजकारण जातीयवादाच्या आसऱ्याने होत असताना या जातीयवादाचा वारंवार उद्रेक होतो, अशी टीका करण्यात काय हशील आहे! रिपब्लिकन पक्षाशी वा मुस्लीम लीगशी निवडणूक–करार करताना

कोणता व्यवहार डोळ्यांपुढे असतो, याची राजकीय पक्षांनी प्रामाणिक कबुली द्यायची ठरविले तर कोणत्या गोष्टी बाहेर येतील, हे सर्वांना माहीत आहे.

हे सर्व अपप्रकार केवळ काँग्रेस पक्षापुरते मर्यादित आहेत असे मुळीच नाही. सर्वच राजकीय पक्ष हेच गणित डोळ्यांसमोर ठेवून निवडणुकांचे राजकारण खेळत असतात. गेल्या वर्षी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर काही राज्यांत काँग्रेसतर पक्षांची मंत्रिमंडळे अस्तित्वात आली. सत्तेपासून दूर असताना हे पक्ष जो सोवळेपणा दाखवीत होते तो त्यांनी सत्ता आपल्या हातातून जाऊ नये यासाठी क्षणार्धात फेकून दिला. चरणसिंग, बोरेंद्रसिंग किंवा गोविंद नारायणसिंग या बंडखोर काँग्रेस सदस्यांना जवळ करताना काँग्रेसतर पक्षांची तत्त्वशून्यता कोणत्या पातळीवर गेले आहे याचे घवघवीत दर्शन घडले. पश्चिम बंगालमध्ये एका कम्युनिस्टानी सरळसरळ राष्ट्रविरोधी कृत्ये करावयास प्रारंभ केला असतानाही संयुक्त मंत्रिमंडळात सहभागी झाल्यामुळे संयुक्त समाजवादी पक्ष या कारवायांबाबत मूग गिळून बसला होता, ही घटना काही फार जुनी नाही. जी गोष्ट संयुक्त समाजवादी पक्षाची तीच प्रजासमाजवादी जनसंघ, स्वतंत्र, आदी इतर पक्षांची. या सर्व राष्ट्रवादी पक्षांनी काँग्रेसविरोध या एकाच नकारात्मक भूमिकेच्या समर्थनार्थ कम्युनिस्टांशी हातमिळवणी करताना किंचितही संकोच बाळगला नाही. या सर्व पक्षांनी उमेदवार निवडीच्या वेळी काँग्रेसप्रमाणेच प्राचीन दृष्टीकोन स्वीकारला होता. उमेदवाराची पात्रता आणि त्याचे चारित्र्य यांचा विचार करण्याऐवजी तो हमखास निवडून येईल याचा अंदाज घेऊनच तिकिटांचे वाटप करण्यात आले होते. अशा रीतीने निवडणुकांचे राजकारण जातीय पातळीवरून हाताळण्यात आल्यानंतर निवडणुका होऊन सत्तासूत्रे हाती येताच जातीयवादाविरुद्ध प्रचार करणाऱ्यांच्या सच्चेपणाबद्दल लोकांना प्रचीति यावी तरी कशी ?

केंद्रीय गृहखात्याने राज्य सरकारांना ज्या जातीय प्रवृत्तींचा बीमोड करण्यास सांगितले आहे त्या प्रवृत्तीपासून आपण दूर आहोत असे केंद्र सरकारला सांगता येईल काय ? याचाच अर्थ असा की हे सारे परोपदेशें पांडित्य आहे. आणि मग जेथे सरळ आचार आणि उच्चार यांच्यात तफावत दिसत आहे तेथे आपल्या उच्चाराला लोकांकडून किंमत मिळावी अशी सत्ताधुरिणांनी अपेक्षा तरी का करावी ! वस्तुतः ज्यांना खरोखरच जातीयतेचा भस्मासूर गाडण्याची प्रामाणिक इच्छा आहे त्यांनी वेळप्रसंगी निवडणुका हरण्याचीही तयारी ठेवली पाहिजे. जो पर्यंत कोणताही पक्ष अशी हिंमत बाळगत नाही आणि चिंतन आणि वर्तन यात सुसंगती असलीच पाहिजे असा आग्रह बाळगत नाही तोवर केवळ परिपत्रकांनी आणि प्रवचनांनी हा जातीयतेचा भस्मासूर गाडला जाणार नाही. परिपत्रके काढणाऱ्यांना आणि प्रवचने झोडणाऱ्यांना हे कळत नाही असेच थोडेच आहे.

— सदाशिव पेठकर

दिनांक १० मे ६८ पासून सुरू होणाऱ्या श्रम-छावणीसाठी चंद्रपूर (चांदा) जिल्ह्यातील 'सोमनाथ जंगल' हे ठिकाण निश्चित केले आहे. भारतातील विधायक कार्यकर्त्यांचे अग्रणी श्री. बाबासाहेब आमटे ह्यांची कर्मभूमी ह्याच परिसरात आहे. त्यांनी २००० एकर जंगल सरकारकडून घेऊन तेथे (Man Power Centre) सुरू केले आहे. तेच ह्या छावणीचे यजमान व मार्गदर्शक आहेत.

'सोमनाथ' हे चंद्रपूर (चांदा) जिल्ह्यातील (महाराष्ट्र) चंद्रपूरहून चौतीस मैलांवरील ठिकाण आहे. सोमनाथला जाण्यासाठी मूल (रेल्वे स्टेशन) –मारोडा (छोटे खेडेगाव) येथे जाणे आवश्यक आहे. मूल-मारोडा नागपूर ते चंद्रपूर ह्या नॅरोगेज लाईनवर रेल्वे स्टेशन असून चंद्रपूरहून किंवा सरळ नागपूरहून (चंद्रपूरला न येता) रेल्वेने किंवा बसने 'मूल'ला जाता येते. वर्ध्यावरूनही मूलला जाण्याची सोय आहे.

# युक्रान्द चो हाक

मूल-मारोडयाहून सोमनाथ येथील श्रम-छावणी पाच मैल आहे. हे अंतर शिबिरार्थींना पायी चालावे लागेल. मूल येथील रेल्वे स्टेशनवर व बसस्टँडवर शिबिरार्थींचे सामान नेण्यासाठी ट्रक्स राहतील.

मूल येथील रेल्वे स्टेशन व बस स्टँडवर एक स्वागत कार्यालय असेल. तेथून सोमनाथ मुक्कामी पोचण्यासाठी सर्व प्रकारचे मार्गदर्शन व मदत मिळू शकेल.

## छावणीचा उद्देश

भारतीय जनता एका ऐतिहासिक महत्त्वाच्या कालखंडातून प्रवास करीत आहे. अशा वेळी कोणकोणत्या शक्ती काम करीत आहेत याचा सूक्ष्म अभ्यास करून, परिस्थितीने देशापुढे ठेवलेले आव्हान स्वीकारून आपला पुरुषार्थ त्यासाठी गाजविण्याची जिद्द बाळगणाऱ्या तरुणांचा सामर्थ्यवान गट तयार करणे.


श्रमाच्या माध्यमातून युवकांनी एकत्र येऊन सामुदायिकपणे जमिनीत घाम गाळावा आणि एकत्रित विचार करून नव्या भारताचे स्वप्न पाहावे. ते स्वप्न साकार करण्यासाठी येथील युवकशक्तीने भगीरथ प्रयत्न करण्याचा विडा उचलावा. या देशातून लोप पावलेली श्रमाची प्रतिष्ठा आणि नाहीसा झालेला श्रमाचा संस्कार पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी तरुणांना श्रम-समाधीचा आनंद लुटण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून उत्पादनाभिमुख सामूहिक श्रम-प्रकल्प योजिले आहेत.

[पान ५९ 'चलो सोमनाथ' पाहा

**मा**झे एक स्वप्न आहे: जॉर्जियाच्या लाल टेकडीवर एक दिवस माजी गुलामांचे मुलगे व माजी गुलामांच्या मालकांचे मुलगे एका टेबलाशी बंधुभावाने एकत्र बसतील.

माझे एक स्वप्न आहे : अन्याय आणि गांजणूक यांच्या दाहक उष्णतेने ग्रासलेल्या मिसिसिपी राज्याचे स्वरूप एक दिवस पालटेल आणि तेथे स्वातंत्र्य आणि न्याय यांची हिरवळ उगवेल.

माझे एक स्वप्न आहे : अलाबामामध्ये एक दिवस छोटी काळी मुले व मुली आणि छोटी गोरी मुले व मुली एकमेकांशी बंधुभगिनी म्हणून हस्तांदोलन करतील.





डॉ. मार्टिन ल्युथर किंग

# स्वप्न अपुरेच राहिले

अठ्ठावीस ऑगस्ट १९६३ ला वॉशिंग्टनमध्ये अडीच लाख निग्रोंचे निदर्शन झाल्यानंतर लिंकन स्मारकापाशी डॉ. मार्टिन ल्यूथर किंग बोलत होते. डॉ. किंग यांचे सारे आयुष्य म्हणजे ही स्वप्ने साकार करण्यासाठी दिलेला अखंड लढा होता. चार एप्रिलला एका माथेफिरू गोऱ्याच्या गोळीने या समर्पित जीवनाचा अंत झाला. स्वप्न अपुरेच राहिले.

निग्रोंचे गांधी म्हणून यथार्थ गौरव झालेल्या या नेत्याची अंत्ययात्रा अमेरिकेच्या इतिहासात अपूर्व होती. निग्रोंवरील अन्यायाविरुद्ध अहिंसात्मक मार्गाने लढणाऱ्या या झुंझार नेत्याला आपली श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लहान–मोठे, काळे–गोरे, गरीब–श्रीमंत असे सर्व क्षेत्रांतील लाखो लोक आले होते. अमेरिकन अध्यक्षाला मिळावा तसा मान जनतेने डॉ. किंग यांना दिला होता.

निग्रोंच्या हक्कांसाठी झगडणाऱ्या अनेक संघटना व नेते अमेरिकेत आहेत पण डॉ. किंग यांचे वैशिष्ट्य म्हणजे गांधीजींच्या अहिंसेच्या मार्गाने त्यांनी आपला लढा लढवून निग्रोंच्या चळवळीला एका वरच्या पातळीवर नेले.

— — — — — —

वा. दा. रानडे

— — — — — —

पेनसिल्व्हानियातील चेस्टर येथील क्रोझर थिऑलॉजिकल सेमिनरीमध्ये मार्टीन किंग धार्मिक शिक्षण घेत असताना त्यांची तत्त्वज्ञानाची बैठक तयार होऊ लागली थोरोचा सविनय कायदेभंग हा निबंध त्यांनी अनेकदा वाचला. हेगेल आणि कान्ट यांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. याच वेळी महात्मा गांधींवरचे एक व्याख्यान त्यांनी ऐकले व त्यांच्या विचारसरणीने प्रभावित होऊन गांधीजींची पुस्तके त्यांनी वाचून काढली. डॉ. किंग म्हणतात, " ख्रिस्ती तत्त्वे माझ्या मनोभूमीत रुजलेली होतीच ती अंमलात कशी आणावयाची याचे तंत्र मी गांधींपासून शिकलो. "

या तंत्राचा प्रयोग करण्याचा पहिला मोठा कसोटीचा प्रसंग १९५५ साली मॉंटगोमेरीमध्ये आला. एक डिसेंबर १९५५ ला रोझा पार्कस् नावाची निग्रो महिला एका बसमध्ये बसली. एका गोऱ्या उतारूला जागा करून देण्यासाठी कंडक्टरने तिला उठायला सांगितले. तिने नाकारले. तेव्हा तिला अटक होऊन दहा डॉलर दंड झाला. अलीकडच्या काळातील निग्रोंच्या लढ्याची सुरुवात या प्रसंगापासून झाली.

## बस बहिष्काराची चळवळ

या प्रसंगानंतर काही तासांतच बसेसवर बहिष्काराची चळवळ डॉ. किंग यांच्या नेतृत्वाखाली मॉंटगोमेरीतील निग्रोंनी हाती घेतली. हा बहिष्कार ९९ टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात यशस्वी झाला. या मोहिमेसंबंधी पत्रके काढून शहरातील पन्नास हजार नागरिकांमध्ये ती वाटण्याची कामगिरी डॉ. किंग यांनी पत्करली होती, ती त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. सार्वजनिक वाहनांत वंशभेद करणे घटनाबाह्य असल्याचा निर्णय अमेरिकेच्या फेडरल कोर्टाने १९५६ साली दिला. या यशामुळे त्या वेळी अवघा २७ वर्षांचा असलेला हा तरुण निग्रोंचा लोकप्रिय नेता बनला.

बसमधील वर्णभेद नष्ट करण्यासाठी स्थापन झालेल्या समितीचे पुढे देशात निग्रोंना गोऱ्यांच्या बरोबरीने नागरी हक्क मिळविण्यासाठी लढा देणाऱ्या मोठ्या कायमच्या समितीत रूपांतर झाले. डॉ. किंग या संघटनेचे अध्यक्ष होते. अमेरिकेत सर्व राज्यांत सर्व प्रौढांना मतदानाचा समान हक्क असावा, शैक्षणिक संस्था, उपाहारगृहे, बागा, सार्वजनिक वाहने वगैरे ठिकाणी वर्णभेद पाळण्यात येऊ नये वगैरे मुख्य मागण्या करून डॉ. किंग यांनी त्यासाठी देशभर प्रचंड आंदोलन केले.

जॉर्जिया राज्यात डिसेंबर १९६१ मध्ये एका सामुदायिक निदर्शनात त्यांनी भाग घेतला. त्यांना अटक झाली. अल्बनीमधील सर्व सार्वजनिक ठिकाणांचा वर्णभेद नष्ट होईपर्यंत मी तुरुंगातच राहीन असे त्यांनी घोषित केले पण दोन दिवसांतच ते जामिनावर मुक्त झाले. चळवळ बारगळली. किंग यांच्यावर बरीच टीका झाली. पुढे आपली चूक कबूल करून डॉ. किंग यांनी लिहिले, " त्या वेळी मी जामिनावर मुक्त होऊन बाहेर येण्यात चूक केली. बाहेर काय घडत आहे हे मला नीट समजले नाही. आम्ही विजय मिळविला असे आम्हांला वाटले पण बाहेर आल्यावर समजले की ती सारी बनवाबनवी होती. चळवळीत मिळालेला पुढाकार आम्ही गमावला व ती

संधी पुनः मिळाली नाही."

अलबनीच्या चळवळीने दुसरा एक धडा किंग यांना शिकविला. ते लिहितात, "अर्थसत्तेच्या यंत्रणेवर हल्ला करण्याऐवजी आम्ही राज्यसत्तेच्या यंत्रणेवर हल्ला केला. आपल्या बाजूला मते नसतील तर राज्यसत्तेच्या यंत्रणेवर विजय मिळविता येत नाही. पण व्यापाऱ्याच्या नफ्याचे तोटयात रूपांतर करण्याची आर्थिक शक्ती तुमच्यात असेल तर आर्थिक यंत्रणेवरचा हल्ला यशस्वी होतो. १९५५ साली मॉंटगोमेरीमधील बसेसवरचा बहिष्कार यामुळेच यशस्वी झाला."

अलबामामधील चळवळीनंतर १९६३ साली बर्मिगहॅमकडे किंग यांनी मोर्चा वळविला. बर्मिगहॅम म्हणजे कट्टर वर्णद्वेष्टयांचा बालेकिल्ला. तेथील चळवळीसाठी तुरुंगात जाण्याची तयारी असलेले दोनशे कार्यकर्ते त्यांनी जमविले. गुप्तहेर आपल्या पाळतीवर आहेत, आपले फोन चोरून ऐकले जात आहेत, अशी शंका येताच किंग यांनी 'जे. एफ्. के.' व त्यांच्या मित्रांनी अशीच सांकेतिक नावे घेतली. आपल्या चळवळीचा उल्लेख ते आपसात 'प्रॉजेक्ट सी' या सांकेतिक नावाने करू लागले. रोज निदर्शने होत. किंग यांच्यासह ३३०० निदर्शकांना अटक झाली. ७ मे १९६३ ला पंचवीसशे निग्रोंनी मोठे निदर्शन केले. ते मोडण्यासाठी पोलिसांनी दंडुक्यांचा हल्ला केला. होज पाईपमधून पाण्याचा मारा केला.

चळवळ शमेना तेव्हा गोऱ्या वर्णद्वेष्टयांनी दहशतीच्या मार्गांचा अवलंब केला. अलबामामध्ये विल्यम मूर यांना गोळी घालून ठार करण्यात आले. निग्रो नेते मेडगट एव्हर्स यांच्यावर मारेकऱ्यांनी त्यांच्या घरापुढेच हल्ला करून त्यांना ठार केले. बर्मिगहॅममध्ये एका चर्चवर बाँब टाकण्यात आला त्यात चार निग्रो मुले ठार झाली. त्याच दिवशी आणखी दोघांना गोळया घालून ठार करण्यात आले. जॅक्सन केंब्रिज येथेही असेच हिंसक प्रकार घडले.

पण या दहशतीमुळे घाबरून न जाता निग्रो समाज आपसातील सारे भेद बाजूला ठेवून समान हक्कांच्या लढयासाठी एकजुटीने उभा राहिला. प्रत्येक मोठया शहरात निदर्शने होऊ लागली. चळवळीत अनेक गोरे लोकही भाग घेऊ लागले.

## मतदानहक्कासाठी लढा

निग्रोंनी १९६३ साली वॉशिंग्टनवर अडीच लाखांचा प्रचंड मोर्चा नेला. निग्रो चळवळीने यादवी युद्धानंतरच्या कोणत्याही वर्षात साध्य केल्या नाहीत, एवढया गोष्टी या एका वर्षात साध्य केल्या. दक्षिणेत ११४१ शाळांतून वर्णभेद रद्द झाला. तीनशे शहरात पोहण्याच्या तलावापासून हॉटेलांपर्यंत सर्व सार्वजनिक सुखसोयींची ठिकाणे गोऱ्यांच्या बरोबरीने निग्रोंना खुली झाली.

निग्रोंना मतदानाचा हक्क मिळण्याच्या मागणीवर डॉ. किंग यांनी गेली काही वर्षे आपला लढा केंद्रित केला होता. दक्षिणेतील राज्यांतून वीस लाख निग्रो मतदारांपैकी फक्त २९ टक्के निग्रोंची नावे मतदारयाद्यांत नोंदली गेली होती. अल-

बामा राज्यातील सेल्मा शहरात बहुसंख्य वस्ती निग्रोंची असता मतदारयाद्यात मात्र फक्त एक टक्का निग्रोंची नावे नोंदलेली होती. मतदानहक्कासाठी सेल्मा येथे झालेल्या सात आठवड्यांच्या चळवळीत दोन हजार निग्रो तुरुंगात गेले. सेल्माजवळच मेरियन येथे चारशे निग्रोंवर लष्कराने गोळीबार केला. त्यात जिमी ली जॅक्सन हा निग्रो तरुण ठार झाला. या दडपशाहीच्या निषेधार्थ डॉ. किंग यांनी सेल्मा ते मॉंट-गोमेरीपर्यंत पन्नास मैलांचा मोर्चा काढला. मोर्च्याच्या सुरुवातीस केलेल्या भाषणात ते म्हणाले, "तुम्हांला मार बसणार नाही, तुमच्या घरावर बॉंब पडणार नाही, तुम्हांला थोडीही इजा होणार नाही, असे आश्वासन मी देऊ शकत नाही. पण जे न्याय्य आहे, त्यासाठी आपण झगडले पाहिजे."

अलबामा नदीवरचा पूल ओलांडून मोर्चा 'हायवे ८०' या हमरस्त्याला लागला आणि साठ सैनिकांनी त्याचा मार्ग रोखला. निदर्शकांना परत जाण्यासाठी दोन मिनिटांचा अवधी दिला, पण कोणी परत फिरले नाही. सैनिकांनी त्यांच्यावर दंडुक्यांनी हल्ला केला. अश्रुधुराचा मारा केला. घोडेस्वार सैनिकांनी पळणाऱ्या निग्रोंचा हातात चाबूक घेऊन पाठलाग केला. काही निदर्शक घोड्यांच्या टाचाखाली चिरडले गेले. हॉस्पिटलांत ७८ जणांना दाखल करण्यात आले. या दडपशाहीच्या निषेधार्थ अमेरिकेतील अनेक शहरांत निदर्शने झाली.

डॉ. किंग यांच्या चळवळीबद्दल व निग्रोंच्या हक्कांबद्दल अध्यक्ष केनेडींना सहानुभूती होती. निग्रोंना समान हक्क देणाऱ्या कायद्याचे बिल त्यांनी कॉंग्रेसकडे पाठविले होते. पण हा कायदा फारच अपुरा आहे, अशी डॉ. किंग यांची त्यावर टीका होती. पण एवढ्या मर्यादित बिलानेसुद्धा केनेडींवर स्ववर्णीयांचा रोष झाला आणि १९६३ च्या गॅलपपोलमध्ये त्यांची लोकप्रियता ६१ टक्क्यांवरून ५९ टक्क्यांपर्यंत खाली आली आणि आणखी दोनच महिन्यांनी प्रतिगाम्यांचा बालेकिल्ला असलेल्या टेक्सासच्या दौऱ्यावर असता डल्लस येथे त्यांचा खून झाला.

जॉन्सन अध्यक्ष झाले. पण त्यांच्या कारकीर्दीतही समान नागरी हक्काच्या कायद्याची प्रगती संथच होती. म्हणूनच डॉ. किंग यांना मतदानहक्काची चळवळ हाती घ्यावी लागली. सेल्मा येथील निदर्शनांचा मात्र परिणाम झाला. कोणत्याही अडचणी न येता निग्रोंना मतदार म्हणून आपली नावे नोंदता यावीत, अशी तरतूद करणारे नवे बिल आपण कॉंग्रेसकडे लागलीच पाठविणार असल्याचे जॉन्सन यांनी घोषित केले. अर्थात केवळ कायद्याने निग्रोंचे प्रश्न सुटणारे नव्हते. कायदा कागदावर न राहता प्रत्यक्षात यावा यासाठी समान हक्कांची चळवळ डॉ. किंग यांना चालू ठेवावीच लागली.

### अवहेलनेचे चटके

डॉ. किंग यांना निग्रो म्हणून बाळपणापासूनच जे अवहेलनेचे जिणे जगावे लागले त्यातील एकेक प्रसंग वाचताना आपल्याकडील डॉ. अंबेडकरांच्या जीवनाची आठवण येते.

## 'पेन'चा फटकारा

"राहायला जागा मिळण्याचे बाबतीत गोरे व निग्रो असा जो भेदभाव केला जातो तो मी पेनच्या एका फटकाऱ्याने दूर करीन," असे आश्वासन निवडणुकीपूर्वी केलेल्या एका भाषणात अमेरिकेचे दिवंगत अध्यक्ष जॉन एफ्. केनेडी यांनी दिले होते. पण अधिकारावर आल्यावर त्यांनी या बाबतीत काहीच हालचाल केलेली दिसली नाही. तेव्हा त्यांना आपल्या आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी निग्रोंनी एक अभिनव मार्ग अवलंबिला. "तुमचा पेनचा फटकारा केवळ पेन नाही म्हणून अडला आहे काय ? तसे असेल तर हे घ्या पेन." असे म्हणून निग्रोंनी हजारो फाउंटन पेन्स केनेडींकडे पोस्टाने पाठविली. त्यानंतर केनेडींनी घरांच्या बाबतीतील पक्षपात दूर करण्यासाठी एक हुकूम काढला पण त्याची व्याप्ती एवढी मर्यादित होती, की त्यामुळे निग्रोंची निराशा झाली.

मार्टिन व त्याचे शिक्षक मेकॉनहून अॅटलांटाकडे एका बसमधून चालले होते. काही गोरे उतारू बसमध्ये चढले आणि त्यांनी जागा करून देण्यासाठी मार्टिन व त्याच्या शिक्षकांनी उभे राहावे असे ड्रायव्हरने सांगितले. या प्रसंगासंबंधीं डॉ. किंग लिहितात., "आम्ही लागलीच उठलो नाही तेव्हा ड्रायव्हरने आमच्या काळ्या वर्णावरून शिवीगाळ सुरू केली. मुळीच हलायचं नाही असं मी ठरविलं होतं पण आपण कायदा पाळला पाहिजे असं शिक्षकांनी सांगितलं. आम्ही उभे राहिलो आणि अॅटलांटापर्यंत नव्वद मैलांचा प्रवास उभ्याने केला. ती रात्र मी कधीच विसरणार नाही. आयुष्यात एवढा तीव्र संताप मला कधीच आला होता असें वाटत नाही."

हे अपमान, अवहेलना किती दिवस सहन करावयाची. त्यांविरुद्ध झगडले पाहिजे असा विचार लहानपणापासूनच मार्टिन किंग यांच्या मनात बळावला व तेच पुढे त्यांनी आपले जीवित कार्य ठरविले. झगडायचे पण ते कोणत्या मार्गाने ? मनावरील धार्मिक वृत्तीच्या पगड्यामुळे अतिरेकी दहशतवादी मार्ग त्यांना पसंत नव्हते. अशा परिस्थितीत गांधीजींच्या अहिंसात्मक लढ्याने त्यांना मार्ग दाखविला. अहिंसात्मक लढ्याला अनुकूल अशी त्यांच्या मनाची शांत घडण लहानपणापासूनच झालेली होती. शाळेत असताना एकदा एका मुलाने मार्टिनला मारहाण करून जिन्याच्या पायऱ्यांवरून खाली ढकलून दिले होते पण मार्टिनने त्याच्यावर उलट हल्ला केला नाही.

अलबामामधील बसेसवरील बहिष्काराची चळवळ डॉ. किंग यांनी गांधीजींच्या मार्गानेच लढवून यशस्वी केली. त्यानंतर याच मार्गाने निग्रोंचा लढा चालू ठेवण्या-

साठी दक्षिणेतल्या दहा राज्यातील निग्रो नेत्यांनी एकत्र येऊन सदर्न ख्रिश्चन लीडरशिप असोसिएशन नावाची संघटना १९५७ मध्ये स्थापन केली. तिच्या अध्यक्षपदी डॉ. किंग यांची निवड झाली. या संघटनेच्या कार्यासाठी पहिल्याच वर्षात किंग यांनी ७,८०,००० मैल प्रवास केला व २०८ भाषणे केली.

आपले गुरु महात्मा गांधी यांच्या देशाला—भारताला भेट देण्याची इच्छा डॉ. किंग यांनी १९५९ साली पूर्ण केली. मुंबई, राजकोट व अहमदाबाद या शहरांना भेट देऊन त्यांनी गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. अहिंसेने गौरवर्णीय अमेरिकनांचे हृदयपरिवर्तन झाले काय? असा प्रश्न दिल्लीतील भेटीत पत्रकारांनी विचारला तेव्हा डॉ. किंग म्हणाले, "अहिंसा म्हणजे एका रात्रीत चमत्कार करणारी जादू नाही; अमेरिकन निग्रोंची श्रद्धा आहे की अमेरिकन घटनेच्या बाहेर न जाता शांतताप्रिय प्रतिकाराच्या मार्गाने आपले हक्क मिळवता येतील." अहिंसामय प्रतिकाराच्या मार्गाने आपल्या लढ्यास लक्षावधि गौरवर्णियांचा पाठिंबा आपण मिळवू शकलो असे त्यांनी सांगितले.

## नोबेल पारितोषक

निग्रोंच्या हक्कांसाठी अहिंसेच्या मार्गाने चालविलेल्या या लढ्याबद्दल डॉ. किंगना नोबेल शांतता पारितोषक मिळाले. पारितोषकाची सबंध रक्कम (५४, १२३ डॉलर) त्यांनी निग्रोंच्या समान हक्क चळवळीसाठी दिली. ओस्लो येथे डिसेंबर १९६४ मध्ये नोबेल पारितोषकाचा स्वीकार करताना केलेल्या भाषणात डॉ. किंग म्हणाले, "आजच्या काळातील कसोटीच्या राजकीय व नैतिक प्रश्नांना अहिंसा हेच उत्तर आहे. हिंसा आणि जुलूम-जबरदस्ती यांचा अवलंब न करता मानवाने या दोहोंवर विजय मिळविण्याची आज आवश्यकता आहे." अवघ्या ३५ व्या वर्षी हा बहुमान त्यांनी मिळविला.

नोबेल पारितोषक मिळविण्यापूर्वीच अनेक विद्यापीठे, धार्मिक व नागरिक संघटनांनी डॉ. किंग यांच्या कार्याचा गौरव केला होता. १९६३ मधील सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणून 'टाईम' साप्ताहिकाने त्यांची निवड केली होती.

ॲटलांटा येथे चर्चजवळ जुन्या पद्धतीच्या एका दुमजली घरात डॉ. किंग राहत. खोलीत महात्मा गांधींचे छायाचित्र लावलेले होते. रोज वीस तास ते काम करीत. सकाळी साडेसहा वाजता उठल्यावर पाऊण तास ते आपल्या अभ्यासिकेत बसून वाचन करीत. फळांचा रस व कॉफीयुक्त उपाहार झाल्यावर सकाळी नऊ वाजता ते ऑफिसला जात. ऑफिसमधील त्यांच्या खोलीत निग्रोंच्या प्रश्नावरील अनेक फाइली व धार्मिक विषयांवरील दोनशे ग्रंथ होते. त्यांचा पत्रव्यवहार मोठा होता. रोज ७०–७५ पत्रे येत. दुपारचे जेवण ते ऑफिसमध्येच घेत. नंतर कामाचे चक्र पुन: सुरू होई ते रात्री दोन-तीनपर्यंत चाले. 'स्ट्राइड टोवर्डस फ्रीडस' आणि 'व्हाय वुई कान्ट वेट' अशी निग्रो आंदोलनासंबंधी दोन पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

याशिवाय इतर अनेक नियतकालिकांतून त्यांचे शेकडो लेख प्रसिद्ध झाले आहेत.

डॉ. किंग यांचा विवाह १९५५ साली कॉरेटा स्कॉट या सुंदर गायिकेशी झाला. त्यांना चार मुले आहेत. खासगी जीवनात डॉ. किंग फार मनमोकळे होते. पोहणे, टेनिस आणि मासेमारी हे त्यांचे आवडते छंद. पण निग्रोंच्या चळवळीला वाहून घेतल्यानंतर त्यांना कित्येक वर्षांत या छंदांसाठी वेळच मिळत नसे.

## धोक्याचे जीवन

निग्रोंच्या हक्कांसाठी केलेल्या लढ्यात किंग यांनी स्वत:चा जीव अनेकदा धोक्यात घातला. त्यांना तीन वेळा भोसकण्यात आले. सहा वेळा त्यांच्यावर हल्ला झाला. त्यांच्या घरावर तीन वेळा बॉंब टाकण्यात आले. पण या दहशतीपुढे ते नमले नाहीत; किंवा अहिंसेचा मार्ग त्यांनी सोडला नाही. अनेकदा जीव धोक्यात घालून त्यांनी प्रवास केला. ते म्हणतात, " हल्ल्याची भीती मी बाळगत नाही. तशी भीती बाळगली तर माझ्या हातून काहीच होणार नाही. एकदा मॉंटगोमेरीला जाताना माझ्याजवळ बंदूक होती. पण माझ्यासारख्या अहिंसात्मक चळवळीच्या नेत्याला बंदूक बाळगण्याचा हक्क नाही म्हणून मी ती टाकून दिली. माणूस किती वर्षे जगला यापेक्षा कसा जगला, याला आयुष्यात महत्व आहे. राष्ट्राचा आत्मा वाचविणाऱ्या चळवळीत तुम्हांला जिवाचे बलिदान करावे लागले तर त्यापेक्षा अधिक उदात्त मरण असू शकणार नाही. " आणि वयाच्या अवघ्या ३९ व्या वर्षी असे उदात्त मरण त्यांना आले.

निग्रोंच्या या थोर नेत्याच्या अकाली खुनाने निग्रो चळवळीची फार मोठी हानी झाली आहे. वर्णद्वेष्ट्या गोऱ्यांच्या दहशतवादाची प्रतिक्रिया म्हणून निग्रो चळवळ दहशतवादी मार्गाकडे झुकण्याचा धोका दिसत असता तिला मार्गापासून परावृत्त करण्यासाठी डॉ. किंग यांच्या अहिंसावादी नेतृत्वाची अजून अनेक वर्षे आवश्यकता होती.

डॉ. किंग यांचे स्वप्न अपुरे राहिले. पण त्यांचे हजारो अनुयायी त्यांच्या नेतृत्वापासून स्फूर्ती घेऊन हे स्वप्न पुरे करण्यासाठी झगडत राहतील आणि एक दिवस ते स्वप्न साकार होईल यात शंका नाही. हे स्वप्न साकार होण्यातच डॉ. किंग यांच्या कार्याची फलश्रुती आहे.

O


# कुस्ती (पण मुक्त)

बौद्धिक डावपेचांनी संस्थानिकांना चीतपट केलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृत्यर्थ या मुंबईत घोड्यांच्या शर्यतीच्या मैदानाशेजारीच एक प्रचंड स्टेडियम उभे आहे. या स्टेडियमवर तूर्त शारीरिक डावपेचांच्या धमाल फ्री स्टाईल कुस्त्या गर्दीत चालू आहेत. गेली बरीच वर्षे या मुक्त कुस्त्या हे मुंबईचे एक वैशिष्टच बनले आहे. मध्यंतरी या फारच मुक्त होऊ लागल्याने (यात स्त्री-पेहेलवान खेळण्यासाठी आणवले जाऊ लागले !) यांवर सदभिरुचीचा भंग होण्याच्या भयाने बंदी घालण्यात आली होती. या कुस्त्यांना स्त्रिया फक्त प्रेक्षकातच दिसतील (त्या बऱ्याच दिसतात; ) या आश्वासनावर की काय, पुन्हा या मुक्त कुस्त्यांना मैदान खुले झाले आहे. तूर्त पाकिस्तानचा मजिद आक्रा, अँथनी क्विन या प्रसिद्ध चित्रपट-नटांशी नाते सांगणारा जॉनी क्विन, युरपमधून आयात केलेला राक्षसी देहाचा दाढी-वाला पॅट रोच, ज्युनिअर सन ऑफ झोरो, सीनीअर सन ऑफ झोरो ( दोघेही बुरखावाले ) स्टंट फिल्मी दुनियेत मशहूर झालेले दारा आणि रंधवा हे दोघे बंधू, कोणी एक अक्रम, वसंतसिंग स्वरनसिंग अशी एकाहून एक उग्र, गलेलठ्ठ, टुणटुणीत आणि अभिनयनिपुण 'बाळे' या कुस्त्यांच्या रिंगणात आठवड्यातून दोन वार उघडीवाघडी एका रंगीन चड्डीनिशी उतरून

रातराणी विजय तेंडुलकर

शक्तियुवतीची, वेदनेची आणि त्वेषाची चित्तथरारक नाटके करीत असतात. हजारो प्रेक्षक –यातले बहुसंख्य रांगडे– या नाटकांशी तद्रूप होऊन घसे बसेपर्यंत उत्तेजन वजा आरडाओरडा करतात, संतापतात, सचिंत होतात, हर्षभरित होऊन नाचतात आणि क्वचित प्रसंगी खुर्च्या फेकून आणि मोडून घरोघर जातात.

मी मध्यंतरी गेलो त्याच संध्याकाळची गोष्ट. आरंभी काही देशी पद्धतीच्या कुस्त्या झाल्या. या म्हणे नियमाने या विलायती मुक्त कुस्त्यांच्या संयोजकांवर लादण्यात येतात. पुढल्या मुक्त खेळाआधी, गर्दी जमेपर्यंतचा करमणुकीचा कार्यक्रम म्हणून संयोजक या अनाकर्षक, मंदगती आणि नुसत्याच दमछाकीच्या कुस्त्यांचा उपयोग करतात. या कुस्त्या खेळणारे बहुसंख्य पेहेलवान सटरफटर असतात. एखादा तर चक्क तुम्ही आम्ही अंघोळीला जाताना दिसू तसा रिंगणात आल्यावर सहानुभूतिपात्र दिसतो ! एखाद्याच पेचात तो बिनशर्त लोळण घेऊन रिंगणातून चालता होतो. प्रेक्षकही हे फारसे गंभीरपणे घेत नाहीत. या कुस्त्यांना देण्यात येणारी चुरचुरीत, क्वचित



बुरखाधारी सन ऑफ झोरो आणि हरदीतसिंग

सस्त्या इंग्रजी-हिंदी-मराठी निवेदनाची जोड हीच प्रेक्षक खरी करमणूक मानतात. उदाहरणार्थ, हा पाहा, हा पेहेलवान त्या दुसऱ्याची कशी कणीक तिंबतो आहे! कुस्त्यात असाही एखादा 'गुदगुल्या-डाव' असतो बरे का. हे दोन पेहेलवान कुस्ती खेळण्याआधीच थकलेले दिसतात की! पेहेलवानसाहेब, झोपू नका, जागे व्हा, कुस्ती अर्धी आहे! हे दोन पेहेलवान आता एकमेकांना खेळकरपणे चाटा मारताहेत. हे कुस्ती कधी बरे खेळणार? हां, हां, पेहेलवानसाहेब, प्रतिस्पर्ध्याच्या जांघियाशी झटापट करू नका, अहो लोकांचा जरा विचार करा! ते केवळ कुस्ती बघण्यासाठीच जमले आहेत! या निवेदनाने मुख्य कार्यक्रमापर्यंतचा वेळ बरा जातो आणि सरकारी नियमही पाळून होतो. देशी कुस्त्या हव्यात तर घ्या देशी कुस्त्या!

## पहिली लढत

एव्हाना चांगला काळोख झाला होता. थोड्या वेळापूर्वी तुरळकच भरलेले मैदान एखाद्या प्रचंड मोहोळासारखे गजबजून उठले होते. चौकोनी रिंगण झगझगीत दिव्यांच्या प्रकाशाने अंधाराच्या पाटीवर छान रेखून निघालेले होते. वातावरण यानंतरच्या शक्तियुक्तीच्या प्रमुख मुक्त नाटकांसाठी झक्क तापलेले होते. बारा रुपयांच्या तिकिटांच्या खुर्च्यांवर 'हायक्लास' माणसांच्या दंडाला दंड घासत टॅक्सीवाले, भट्टीवाले, पाटीवाले येऊन गर्दीने बसलेले दिसत होते. उत्कंठेने मुद्रा फुलल्या होत्या. आता थोड्याच अवकाशात घडून येणाऱ्या लढतींची गरमागरम चर्चा चालू होती. ये साले ×××× म्यानेजमेंटवाले कभी कभी चारसोविसगिरी करते हैं असा संशय यातला एक शेजारच्या एका हायक्लास वयोवृद्ध पारशाला त्याची ऐकून घेण्याची इच्छा नसतांना ऐकवीत होता.

पहिल्या लढतीचे पेहेलवान दसऱ्याच्या हत्तींसारखे झुलत झुलत रिंगणात हजर झाले. एक स्वरनसिंग (स्वर्णसिंगचा आखाड्यातला अपभ्रंश) आणि दुसरा सरवनसिंग का असाच कोणीतरी. एक उंच, तगडा तिरशिंगराव वाटणारा तर दुसरा बुटका, चौकोनी, मंदबुद्धी मुद्रेचा. दोघांनीही शेक-हँड करून, नियम सांगण्याचा–दर कुस्ती आरंभीचा विधी–पंचाला उरकू देऊन आपापल्या मखमली रंगीन झुली उतरवल्या आणि रिंगणाच्या दोऱ्यांशी झटके घेऊन आणि उठाबशा काढून शरीराचे स्नायू मोकळे केले. पंचाने दोघांचे हात, जांघियांच्या मागल्या बाजू वगैरे तपासल्या. हाही एक नाट्यपूर्ण विधीच– कोणी काही 'हिंसक' बरोबर ठेवलेले नाही हे पाहाण्यासाठी. आणि मग घंटा वाजून पहिली फेरी एकदाची सुरू झाली.

या कुस्त्यांना फार नियम नाहीत. असतात त्यांचीही अंमलबजावणी पंच जरा सैलपणेच करतो. महत्त्व हजारो प्रेक्षकांनी काढलेल्या तिकिटांना असते. त्यांचे पैसे वसूल झालेच पाहिजेत. त्यासाठी भरपूर हाणामारी, विव्हळणे, फेकणे, आपटणे, हातपाय मोडण्याची नाटके करणे, हवेत उशी घेऊन छातीपोटात लाथा हाणणे,

एकमेकांना उचलून रिंगणाखाली टाकणे आणि काही नाही तर नाकात बोटे घालणे, चावणे, हे सर्व व्हावे लागते, होऊ दिले जाते. क्वचित रक्तही निघते. निदान दर कुस्तीनंतर एक तथाकथित डॉक्टर प्रथमोपचारांची पेटी घेऊन रिंगणात येऊन दुखावल्या पेहेलवानाची देखभाल करून जातो. निवेदक, हे बिचारे मल्ल देशोदेशी फिरून पोटासाठी मार खात असतात, प्रसंगी बिचारे हातपाय मोडून घेतात— असे हे यांचे वाईट जिणे— असली सहानुभूती निर्माण करणारी भाषा करीत असतो.

पहिल्या कुस्तीत स्वरन का स्वर्ण कोण तो सिंग या मुक्त कुस्तीतही भरपूर नियमबाह्य खेळून सरवनसिंगाविरुद्ध शेवटी जिंकला. लढता लढता तो प्रेक्षकांनाही हातवारे करून आव्हाने देत होता, त्यांना उद्देशून थुंकत होता आणि प्रतिस्पर्ध्याच्या नाकाडोळ्यांत बोटे घालण्यासारख्या त्याच्या नियमबाह्य खेळाच्या नाटकाने अस्सल सात्विक संताप चढलेले शौकीन प्रेक्षक त्याला उद्देशून निषेधप्रदर्शक आरडाओरडा करीत होते. या कुस्त्यांच्या रिंगणात हे असे तथाकथित खलपुरुष लागतातच. मागे किंग्कॉंग हा उमदा मल्ल ही भूमिका उत्कृष्ट करी. उत्पन्नात त्याची भागी होती. तूर्त स्वरनसिंगकडे हे काम दिसले. हे 'खलपुरुष' रिंगणात तमाम 'हीरो' मल्ल-जमातीचा राडा करण्यासाठी हरामी डावपेचांनी लढत असतात. प्रेक्षकांचा रोष यांच्यावर जेवढा जास्त तेवढा त्यांचा लोभ 'हीरो' मल्लांवर वाढता राहतो. नायक—खलनायक यांच्या जोडीला 'कामिक' मल्लही ठेवले जातात. उदाहरणार्थ या स्वरनसिंगचा बुद्दू मुद्रेचा लढाऊ प्रतिस्पर्धी नाकात स्वरसिंगाची बोटे गेली की 'आबडबडबड' असे काही तरी आवाज करी आणि उभे स्टेडियम पोटे धरून हसे. या साऱ्यामुळे कुस्त्या पाहण्यासाठी शौकीन वाढती गर्दी करून सोडतात. उत्पन्न दाबजोर होते. या मर्दानी नवरसयुक्त नाटकावर अवलंबून असलेल्या पाचपन्नास माणसांना बरे पैसे मिळतात.

तिरशिंगराव स्वरनसिंगाच्या उद्वेगजनक विजयानंतर दुसरी कुस्ती अजित—हा मद्रासवाला फिल्मस्टार आहे म्हणतात—आणि ज्युनिअर सन ऑफ झोरो यांच्यात झाली. हे झोरोचे दोन बच्चे या हंगामातले विशेष आकर्षण आहे. धाकटी पाती आणि मोठी पाती ओळखणे मुष्किल अशी दोघांची सारख्या मापाची शरीरे आणि त्यावर काळे तंग बुरखे. कोणाही एकाच्या कुस्तीत आरंभी दोघेही रिंगणात उतरतात. दर फेरीनंतर बाहेरचा दुसरा रिंगणात जाऊन पहिल्याशी कानगोष्टी करतो. निवेदक म्हणत होता, यांतला धाकटा कोण, मोठा कोण, कळणे महामुष्किल आहे. बघा. उंच, दणकट तथाकथित धाकट्याने आडव्या थुलथुलीत सशक्त अंगाच्या अजितला अनेक प्रकारे पिटून काढले. अजितनेही त्याची हड्डी नि हड्डी नरम केली. याही कुस्तीत नियमभंग सारखा चालूच होता. बुरखेवाल्याला इशारे दिले जात होते. अखेर दोघेही रिंगणाखाली जाऊन आदळले. दहा आकडे मोजून झाल्यानंतर लोळत, विव्हळत कसेबसे रिंगणात आले. तोवर कुस्ती संपली होती. कोणीच जिंकले नव्हते.

या अनिर्णित कुस्तीआधी संयोजकांपैकी एक झिडपिडा सूटवाला लाऊडस्पीकर-सकट रिंगणात आला. त्याने ' निवेदन ' केले. तो म्हणाला, झोरो-पुत्राची म्हणून एक छबी एका उर्दू छाप्यात प्रसिद्ध झाली आहे. या छबीप्रकरणी हा मल्ल अतिशय चिडला असून या खोटया छब्या छापून माझ्या कीर्तीला तुम्ही लोक सुरुंग लावता असे त्याने या कुस्त्यांच्या कंत्राटदार मंडळीला सांगितले आहे; परंतु या छबीशी आमचा काही एक संबंध नाही. आम्ही ती छापण्यासाठी दिलेली नाही आणि स्वत:च्या जबाबदारीवर असले कृत्य यापुढे जे कोणी करतील त्यांनी कायदेशीर परिणामासाठी तयारी ठेवावी. लगेच या घोषणेची छापील पत्रके प्रेक्षकांत मुक्त हस्ते वाटण्यात आली. (हेही नाटक-सराईत प्रेक्षक).

## एकजात सगळे नाटक

तिसरी कुस्ती रंधवा-दाराचा फिल्मस्टार भाऊ-आणि झोरोपुत्र, थोरली पाती यांच्यात जुंपली. तमाम प्रेक्षक रंधवाच्या पार्टीचे होते. त्याला तारस्वरात उत्तेजन दिले जात होते, डिवचले जात होते, उ:स्फूर्त सल्ले देण्यात येत होते. पण थोरला झोरोपुत्र रंधवाला आरंभापासून भारी पडत होता. रंधवाचे शरीर पुष्कळच घट्ट आणि घाटात त्यामुळे पडलेल्या पेचातून तो नवे पेच घालीत होता. टाकण्यात आलेले डाव सफा उलटवीत होता, जेर होऊनही पाठ म्हणून टेकीत नव्हता, जाया अवयवांनिशी पुन्हा कुस्तीसाठी धडपडत उभा राहात होता. हजारो प्रेक्षक ओरडत होते. पहिली फेरी बरोबरीत झाली. दुसरी बरोबरीत झाली. तिसरी बरोबरीत झाली. चौथी रंधवाने जिकली (ही फेरी ठरल्याहून कमी वेळात संपवण्यात आली, असा ओरडा काही तज्ज्ञ प्रेक्षक करीत होते.) पाचवी बरोबरीत झाली आणि सहावीत दोघेही निकराने खेळत असता झोरोच्या त्या थोरल्या बच्चाने रंधवाला मारमारून लुळे केले. तो फिल्मी बहादूर त्यातूनही उठला. पुन्हा झोरोच्या बच्चाने त्याला अवघड पेचात जखडून शरण आणण्याची जिद्द केली. फिल्मी जनतेचा लाडका दारा-बंधू रंधवा त्यातूनही भेलकांडत उ ला. त्याचा बुरखेवाला प्रतिस्पर्धी मार देऊन आणि खाऊन थकला होता. तेवढया निमिषार्धात सफाईने धाकटा झोरो-बच्चा रिंगणात घुसला. पंच त्याला बाहेर होण्याला ओरडून सांगू लागला. दोघेही बुरखेवाले किंचित्-काळ रिंगणात एकत्र होते. मग एक बाहेर गेला. प्रेक्षकांचा प्रचंड ओरडा चालू असता रिंगणातल्या बुरखेवाल्याने रंधवाला सफा चीत केले. पंचाने चि. झोरोची जीत जाहीर केली. प्रेक्षक ओरडू लागले, वो ज्युनियर है-वो रिंगमे कैसा आया-डिसक्वालिफाय करो-रेफरी, चले जाव-ओरडा वाढत चालला. (नाटक ! एकजात सगळे नाटक !-माहीतगार एकमेकांना सांगत होते.) मग रेफरी ऊर्फ पंचाने दोन पायांवर कशाबशा उभ्या राहिलेल्या हडबडल्या रंधवाची जीत जाहीर केली. तरी ओरडा ओसरला नाही. उभे स्टेडियम पक्षांचा भला मोठा थवा कलकलावा तसे ओरडत राहिले. रेफरीको डिसक्वालिफाय करो ! डिसक्वालिफाय करो ! रिंग-

णातल्या झोरो–पुत्रांना उद्देशून अर्वाच्य शिव्यांची सरबत्ती चालू होती. झोरोपुत्र परस्परांचे हात उंचावून विजय–नृत्य करीत होते. प्रेक्षकांच्या मुठी हवेत नाचत होत्या. आवाज तारसप्तकात गेले होते. मुद्रा तारवटल्या होत्या. अनेक प्रेक्षक खुर्च्यांवर उभे राहिले होते. रिंगणात संयोजकांपैकी कोणी आले. रंधवा संयोजकाच्या हातचा लाऊडस्पीकर पकडून धापा घालीत म्हणाला, ते दोघे बेकायदा खेळतात. आम्हा दोघा भावांबरोबर त्यांची कुस्ती ठेवा. संयोजक म्हणाले, यह कैसा अब हो सकेगा। प्रोग्रामके हँडबिल्स तो तय्यार है–रंधवा म्हणाला, त्यांच्याबरोबर आमची कुस्ती होणार नसेल तर या मैदानात आम्ही पुन्हा उतरणार नाही. लढण्यासाठी आम्ही युरोपला जाऊ. संयोजक म्हणाले, शनिवारी ही कुस्ती ठेवणे कठीण आहे. प्रेक्षक आक्रोशत होते, झाली कुस्ती खोटी खेळली गेली, तीच पुन्हा होऊ द्या ! कोणी ओरडत होते, दाराला आताच बोलवा. कोणी ओरडत होते, रेफरी चोर आहे ! कोणी किंचाळत होते, रंधवा चारसोबीस आहे. हलकल्लोळ चालू होता. यातच झोरोचे बच्चे पोलिसपाहाऱ्यात मैदानाबाहेर गेले. दर्दी प्रेक्षक आरामात बसून एकमेकात म्हणत होते, नाटक ! सर्व एक जात नाटक ! नाटकवाल्यांना काय जमेल, असे नाटक ! नियोजकांनी जाहीर केले, रंधवाची आणि आमच्या हजारो प्रेक्षकांची इच्छा विचारात घेऊन येत्या शनिवारी आम्ही झोरोचे बच्चे आणि दारा–रंधवा यांची लढत जाहीर करतो. ही लढत प्रेक्षणीय होणार ! दर्दी प्रेक्षक म्हणाले, हँडबिले कधीच छापून तयार असणार !

पण प्रेक्षकांचा ओरडता जमाव या घोषणेने शांत होण्याऐवजी भलतेच घडले. जमाव जागा सोडू लागला, संयोजकांच्या आणि निवेदकांच्या दिशेने उडया घेऊन पुढे येऊ लागला. पोलिस धावले. इन्सपेक्टर्स धावले. काही खुर्च्या फेकल्याचे धाड् धाड् आवाज आले. एवढा वेळ आरामात बसलेली दर्दी मंडळी गडबडीने सावरून उठत म्हणाली, दंगल होणार. चला, बाहेर पडा ! पोलिसांनी पुढे आलेल्यांना मागे हटवले. दुसरीकडून दुसरे पुढे आले. पाहता पाहता रिंगणाच्या एका बाजूला गर्दी उसळली. निवेदकाचा आवाज बंद पडला. बाचाबाची सुरू झाली. एव्हाना रंधवा रिंगणातून मैदानाबाहेर निघून गेला होता. नव्या कुस्तीचे वीर लांब केसांचा मजीद आक्रा आणि उंचाटा गोरा धम्मक जॉनी क्विन रिंगणात येऊन दाखल झाले. त्यांच्या कुस्तीची पहिली फेरी सुरूही करण्यात आली. हिशेब हा की याने यथावकाश वातावरण स्थिरस्थावर होईल. पण ते दोघे एकीकडे एकमेकांना आपटत धोपटत आणि रगडत होते आणि जरा अंतरावरच रिंगणाखाली संतप्त प्रेक्षक संयोजकांना घेरून वाचावाची करीत होते. आणखी खुर्च्या हवेत उडाल्या. ओरडा ऐकवत नव्हता. कोणीच लक्ष देत नाही असे पाहून रिंगणातली कुस्ती अखेर नाइलाजाने थांबली. कुस्ती होता कामा नये असे प्रेक्षक किंचाळत होते. कुस्त्या बनावट होतात असा आरोप करीत होते. आता रिंगणातले बंबे पेहेलवान प्रेक्षक बनले होते आणि अख्खे

स्टेडियम दंड थोपटून लढाईचे पवित्र टाकीत होते ! संयोजकांपैकी कोणीतरी मजीदच्या हाती लाऊडस्पीकर दिला पण लोक त्याचेही ऐकू इच्छीत नव्हते. कोकाकोल्याच्या दोन तीन बाटल्या उंच उडून भिरभिरत गेल्या. पाकिस्तानवाला मजीद रिंगणात फिरून लोकांना शांतीचा उपदेश 'जनाब' 'हुजूर' अशा संबोधनांनिशी करीत होता. तुम्ही करता त्या कृत्यांनी तुमच्या बांधवांनाच दुखापती होतात, याची अत्यंत समजूतदार जाणीव देत होता. लोक एकण्याच्या अवस्थेत मुळीच नव्हते. पोलिस धावपळ करीत होते. एक तुमानवाला नुसत्या गंजिफ्रॉकात रिंगणात चढून लोकांचा प्रतिनिधी म्हणून जोरजोराने भाषण करू लागला. लोकांनीच त्याला खाली ओढले. रंधवाला बोलावून आणताहेत, तो येत आहे, तो एक मिनिटात दाखल होईल असे आता मजीद मधून मधून जाहीर करीत होता आणि रंधवा येत नव्हता. लोक शांत होत नव्हते. मजीद त्यांना शांततेचे महत्त्व परोपरीने वर्णन करून सांगत होता आणि त्याच्याचसारखा उघडा-वाघडा जॉनी क्विन लॉजच्या बाथरूमसाठी नंबर लावलेल्या रहिवाशासारखा रिंगणात टॉवेल पांघरून पोट आणि पाठ खाजवीत फिरत होता. रिंगणाला प्रेक्षकांचा वेढा पडला होता. मुळात सगळे पूर्वनियोजित नाटक असले तर त्यातून बेमालूमपणे आता एक अस्सल रौद्र असंतोष उभा राहून नाटकाचा घास घेऊ पाहात होता.

## पुन्हा भेट शनिवारी

आता मजीद डोके खाजवून म्हणाला, मी जाऊन रंधवाला घेऊन येतो तोवर इथेच थांबा. लोक ओरडले, पळून जाशील ! मजीद म्हणाला, पण मुंबईबाहेर तर नक्कीच पळणार नाही. लोक तत्काळ ओरडले, काय नेम ? मजीद पुन्हा जरा विचार करून म्हणाला, हे बघा, आरामात बसून घ्या, आमची कुस्ती तरी पाहा. कुस्ती लढून आम्हाला जाऊ द्या. (त्याला त्याच्या बिदागीची फिकीर !) लोक ओरडले, नाही ! बनावट कुस्ती पुन्हा खरी झाली पाहिजे ! आज, आत्ता, याच तिकिटात !

चतुर संयोजकांपुढे बाका पेच उभा होता. रंधवा तर मैदान सोडून मकाणी पोचला असावा. झोरोचे बेटेही बुरखे उतरवून गेले असावेत. त्यांच्या 'भूमिका' त्यांनी चोख केल्या होत्या. ते कशाला थांबतील ? जमाव तर अनावर होत होता. कोणत्याही क्षणी मोठ्या नासधुशीला सुरुवात होऊ शकत होती. मुक्त कुस्तीऐवजी मुक्त दंगलीची हवा होती. रात्रीचे साडेदहा वाजून चालले होते. पेहेलवान जॉनी क्विनने कंटाळून चक्क एक जांभई दिली. मजीद स्थितप्रज्ञाची लक्षणे दाखवीत रिंगणाच्या दोरखंडावर ओळकंबून उभा होता. वेळ चालला होता, शेवटी एकदाची संयोजकांनी घोषणा केली, शनिवारी कुस्ती होईल, आजची तिकिटे शनिवारी चालतील.

लोकांना हेच हवे होते. रिंगणातली हारजीत पाहता पाहता अचानक त्यांची जीत

झाली होती. खुषीचा ओरडा झाला, टोप्या, रुमाल, हँडबिले, खुर्च्या उंच उडाल्या. मैदान ओसरण्याला सुरुवात झाली.

आता पुन्हा शनिवारी हाच जमाव नव्या उत्सुकतेने असाच जमणार होता. अविश्वासाने भरलेल्या मनांनी सच्च्या कुस्त्यांची अपेक्षा करणार होता, आणि या नाट्यसंपन्न मुक्त कुस्त्यात 'सच्ची कुस्ती' हा शब्दप्रयोगच विजोड होता. पुन्हा नवी थरारक नाटके नव्या धाडसाने केली जाणार होती. नवनवीन गलेलठ्ठ शरीरांची नवी आपट धोपट, नवे खरे खोटे आणि हराम खेळणे, नव्या वेदना, नवे विजयोन्माद, नवे नियमभंग, नवे इषारे, नवी आव्हाने, नव्या घोषणा, नवी तात्पुरती शारीरिक तोडमोड आणि जमल्यास नवे रक्त—या खेपेस अधिक सफाईने हे सारे केले जाणार होते.

खरी मुक्त कुस्ती मुळी पेहेलवानांमधली नव्हतीच. ती संयोजकांची बुद्धी आणि प्रेक्षकांची शक्ती यातली होती. कधीपासून ती चालत आली होती आणि चालू राहणार होती. ◻

**सुबह होती है**

**श्याम होती है**

कालच्या चित्रतारे–तारकांची नाटके व्यावसायिक मराठी रंगभूमीवर तूर्त पाहतोच; पण उद्याच्या चित्रपट–ताऱ्यांची नाटके काही वेगळी असतात की काय, ते पाहण्याच्या उत्सुकतेने काही दिवसांपूर्वी संध्याकाळी मुंबईच्या रवींद्र नाट्यगृहात गेलो. तिथे पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटचे विद्यार्थी एक हिंदी नाटक दाखविणार होते. दरसाल या संस्थेचे विद्यार्थी आपले अभिनय-गुण दाखविण्यासाठी असे एक हिंदी नाटक बसवतात आणि मुंबईत येऊन त्याचा एक प्रयोग चित्रपटसृष्टीतील नामवंतांना बोलावून त्यांच्यासमोर करून दाखवतात. हे नाटक संस्थेपैकीच कोणीतरी उपलब्ध नटसंचाला पुरेपूर वाव मिळावा अशा हिशोबाने बेतलेले असते.

यंदाचे दोन अंकी नाटक होते 'सुबह होती है, श्याम होती है.' नावावरूनच नाटकाच्या सर्वसमावेशक जातीची कल्पना येऊ शकत होती. कोणतीही पात्रे, कोणतेही प्रसंग, इतकेच नव्हे तर कोणतेही नाटकदेखील या नावाखाली सुखाने खपण्याजोगे होते. लेखक दिग्दर्शक होते रौशन तनेजा. संस्थेत हे अभिनयाचे वर्ग घेतात. अपेक्षेप्रमाणे हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ-कनिष्ठ बरेच कलावंत प्रेक्षक



**बलदेव खोसा । उल्का सोनावणे । प्रेमाचे महाविद्यालयीन मेतकुट रंगवताना. ।**

म्हणून हजर होते. (आणखी हजर राहिले असते पण चित्रपटगृहवाल्यांविरुद्धचे त्यांचे आंदोलन त्याच दिवशी ऐन जोरात होते.) नाटयगृहाच्या महाद्वारापासून वातावरण उत्साहाचे होते. उमेदीने ओसंडणारे तरुण चेहरे जागोजाग दिसत होते. कॉलेजच्या स्नेहसंमेलनाला यावे तसे वाटत होते. फरक इतकाच की शिस्त बरीच अधिक होती; आणि तरी डोळे वटारून संशयग्रस्त मुद्रांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींवर लक्ष ठेवीत फिरणारी प्राचार्य, प्राध्यापक आदि मंडळी उणी होती. विद्यार्थ्यां-इतक्याच हसऱ्या आणि उमद्या मुद्रेने एक जरा अधिक प्रौढ गृहस्थ समारंभाचा 'बॅज' छातीला लावून विद्यार्थ्यांतच एका बाजूला उभे होते; हे—कोणीतरी सांगितले की—संस्थेचे प्राचार्य जगत मुरारी.

## हॉटेलची पार्श्वभूमी

प्रत्यक्ष नाटकात सुमारे तीन डझन भूमिका होत्या. एका हॉटेलच्या पार्श्वभूमीवर सकाळ संध्याकाळ यातले कोणी कोणी येत होते, बसत होते, बोलत होते, हसत रडत आणि गोंधळ घालीत होते आणि चालते होत होते. हॉटेल म्हटले की आव-जाव घर तुम्हारा; यामुळे येण्याजाण्याच्या निमित्तांचा मुद्दा लेखक—दिग्दर्शक

तनेजासाहेबांनी लेखनारंभीच मिटवला होता. भल्या रामपारी दूधवाला येऊन हॉटेलच्या भटारखान्यात दुधाची चरवी रिकामी करून जातो, 'बरफ'वाला बर्फाची लादी पोचवून जातो आणि या निमित्तांनी पेंगत्या मॅनेजर-कम्-वेटरला जाग येते इथून नाटकाला प्रारंभ झाला. चार कामगार पलीकडे जागरणाच्या चेहऱ्यांनी गरमगरम चायचे घुटके घेत बसले होते, एक-बहुधा ब्रह्मचारी-बुद्धिजीवी सकाळचा ताजा पेपर सिंगल चायच्या पैशात डोळ्यांनी निपटून घेत होता. सुस्तावला वेटर झोप उडवीत यातून, अजून स्वप्नात असावा तसा, फिरत होता. सुरुवात तर चांगली झाली. हुबेहूब पुण्याच्या नाहीतर मुंबईच्या एखाद्या कळकट हॉटेलतला सकाळी सहा-सात वाजतांनाचा मुड. (फक्त नेपथ्य फारच देखणे आणि आल्हाददायक होते-असू द्या; पोरांना उत्साह आहे!) मग एक वैफल्यवादी तरुण आला. एवढ्या सकाळीच बेटा पेग मारून आला होता; की दिलीपकुमार शैलीचा अभिनय करीत होता, कोण जाणे! 'कोई संबंध नही'... असे तो वारंवार पुटपुटत होता. मागोमाग एक वाया गेलेला तरुण आला. हा आकर्षक लाल पिवळ्या हिरव्या रंगीबेरंगी कपड्यात होता. सारखा हसत होता. याच्यापाशी नोटांची दोन बंडले होती. यातले एक खऱ्या नोटांचे, एक खोट्या नोटांचे. पण कुठले कुठले ते कोणालाही ओळखता येणार नाही असे याचे म्हणणे होते. एक चाकूही होता. (हा त्याने दुसऱ्या अंकात बाहेर काढून वैफल्यवादी तरुणावर उगारला.) वेटर याला प्रेमाने वारंवार म्हणत होता की एक दिवशी गोत्यात येशील. मग एक फाकडा तरुण ऑफिसर आणि त्याची सेक्रेटरी आली. ऑफिसर नुकताच विलायतेच्या विमानातून हॉटेलच्या दारात उतरावा तसे विलायती हिंदी बोलत होता आणि कोणत्याही क्षणी आपण परत विलायतला जाऊ असे स्वतःला आणि समोरच्या सेक्रेटरीला पुन्हा पुन्हा बजावीत होता. तरी पण विलायतेहून येऊन त्याला बरेच दिवस झाले होते आणि आणखीही बरेच दिवस तो याच देशात नाइलाजाने नोकरी करणार होता असे दिसत होते. त्याच्या जटावारी अत्याधुनिक सेक्रेटरीला खरे म्हणजे एअर होस्टेस व्हायचे होते; पण घरवाले मना करते थे. याने तीही परिस्थितीवर फार नाराज होती. केवळ व्यवहार म्हणून ही दोघे एकमेकांना सहन करीत होती. याच्या नंतर कॉलेजमधली एक पोरगी आणि पोरगा यांचे क्रम लागले. या दोघांचे एक अव्यवहारी प्रेमळ नाते अगदी आरंभीच्या बोटचेप्या अवस्थेत होते. त्यात नेमका पोराचा शेटजी बाप एका वकिलासमवेत येऊन पडला. प्रेमाचे जमलेले मेतकूट तात्पुरते बिनसले आणि एका पोलिस फिर्यादीतून चोरवाटा काढण्याचे वकिली डाव शेठजी आणि वकील यात सुरू झाले. इच्छा नसताना पोरगा यात गुंतला. वाकून टेबलाखालून तो पलीकडच्या मैत्रिणीला हातवाऱ्यांनी पुढली गुप्त अ‍ॅपॉइंटमेन्ट देत असताना बापाच्या हाती गावला आणि हे सर्व बऱ्हंशी मुकाट्याने रोज पाहणाऱ्या वेटरच्या सर्वज्ञ मुद्रेवर पहिल्या अंकाच्या प्रथमार्ध अंधारून एका

निरोप-समारंभाने पहिल्याच अंकाचा द्वितीयार्ध सुरू झाला. चित्रविचित्र बुद्धिजीवी माणसे जमली होती. ही एका कचेरीत काम करणारी असावीत. आणि वर्माजी नामे खडूस वरिष्ठाला निरोप देण्यात येत होता. त्या निमित्ताने खाण्यापिण्याचा कार्यक्रम असल्याने झाडून सारे हजर होते. पहिल्या अर्धातले काही वेष पालटून या अर्धात नव्या भूमिका वठवीत होते. आपल्या 'वाऱ्यावरची वरात'चे दाट स्मरण देणारे हे प्रकरण जवळपास आटोपून पहिल्या अंकाचा पडदा खाली आला.

येथवर काही 'घडले' नव्हते. दुसऱ्या अंकात कॉलेज पातळीवरचे कोवळे मेतकूट पार बिनसले; महत्त्वाकांक्षी जटाधारी सेक्रेटरीने एका खालसा संस्थानाचा राजकुमार गळाला लावल्याचे दिसले, आणि वाया गेलेल्या तरुणाने वैफल्यवाद्याला भोसकण्याचा प्रयत्न केला पण चुकून वैफल्यवाद्याच्याच हातून तो भोसकला जाऊन मेला. हे सर्व 'घडत' असता दोघे 'बीटनिक्स' आणि दोन प्राध्यापक आपापल्या पातळ्यांवर स्वतंत्रपणे बौद्धिक सुखसंवाद करून गेले. याही साऱ्याला वेटर साक्षी होताच. वाया गेलेल्या तरुण माणसाच्या पालथ्या मुड्याशी तो प्रार्थनेला बसावे तसा बसला आणि दुसऱ्या अंकाचा पडदा पडला.

## बोध ?

आता या सगळ्याचा अर्थ काय ? आयुष्य सरळ-साधे नाही, सुबह-श्यामसारखे ते नियमित किंवा अपेक्षित गतीने जात राहीलच असे नाही हा एक अगदी ढोबळ अर्थ. प्रकाश-अंधारासारखे ते परस्परविरुद्ध वैशिष्ट्यांनी युक्त आणि गूढ आहे असा आणखी एक अर्थ. वैफल्य राहते आणि वाया गेलेल्या का होईना, मर्दुमकीचाच मुडदा पडतो, हा हवा तर आणखी बोध. असे होत असतानाही काही माकणसे बौद्धि सुखसंवाद, नाहीतर प्रेम, नाहीतर कोकाकोल्याच्या बाटल्या फस्त करीत जगतच असतात हा या बोधातला पुरवणी-बोध. काही का असेना, मुख्य बोध फिल्म इन्स्टिट्यूटची मंडळी नाटक मन लावून करतात हा होता. बारीक बारीक गोष्टींतही ही मनःपूर्वकता प्रतीत होत होती.

अभिनयगुण अनेकात होते. उदाहरणार्थ कॉलेज विद्यार्थ्याची भूमिका करणारा बलदेव खोसा, वेटरची भूमिका करणारा पुनया दास, स्टेनोचे काम करणारा गोवर्धन असराणी, ऑफिसर, वर्माजी आणि बीटनिक अशा तीन भूमिका करणारा नवीन निसचोल हे सर्व लक्षात राहिले. उल्का सोनावणे म्हणून एक महाराष्ट्रीय विद्यार्थीनीही या नाटकात कॉलेजमधली लाजाळू पोर आणि झाली सवरलेली टायपिस्ट मणीबेन या दोन भूमिकांत काहीशा नवथर संकोचाने वावरून गेली.

एकूण अभिनयावर आणि नाट्यप्रयोगावरच चित्रपटतंत्राची छाया होती असे म्हणण्याचेही कारण नाही. चित्रपटतंत्राचाच अभ्यास करणाऱ्यांनी तर हे नाटक सादर केले ! यातला कोणीही नानासाहेब फाटक, काशीनाथ घाणेकर नाहीतर शंकर घाणेकर होण्यातला नव्हता. सर्वांची प्रांजळ महत्त्वाकांक्षा, असली तर, ती

दिलीप, अशोक, मनोज, मेहमूद नाहीतर आशा, वैजयंती वगैरे होण्याचीच असणार हे उघड आहे. त्या प्रकारचेच प्रयत्न आपापल्या भूमिकात रंगभूमीवर या बच्चा नटांनी कसून केले; आणि हिंदी चित्रपटांचाच सराव असलेल्या प्रेक्षकवर्गाने या प्रयत्नांना दादही दिली.

भूमिका भरपूर असूनही प्रयोग सफाईदार झाला हे दिग्दर्शकाचे यश. नाटकातल्या सूत्रावर प्रेक्षकांचे ध्यान युक्तीप्रयुक्तीने एकवटत नेणे हे ज यशस्वी दिग्दर्शकाचे अधिक मोठे कार्य, ते जमले नाही. परिणामी नाटकानंतरच्या कौतुक-सोहळ्यात नाटकाविषयी 'चार शब्द' विनंतीवरून सांगताना रामानंदसागर यांच्यासारखा मुरब्बी लेखक आणि दिग्दर्शकही भावनावेगाने गळा दाटून आल्याचा हृदयस्पर्शी अभिनय वारंवार करून बहुधा नाटकांच्या सूत्रासाठी मनोमन चाचपडत होता.

तरीही एवढे खरे की आपल्या अनेक नाटकवाल्यांपेक्षा किंवा नाटकात आलेल्या चित्रपटवाल्यांपेक्षा हे चित्रपट शाळेतल्या विद्यार्थ्यांचे नाटक वेधक आणि स-जीव वाटले.

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

# मला त्यानं वणवण भटकायला लावलं होतं
# माझी आई भुकेनं तडफडून गेली होती
# म्हणून....म्हणून मला त्याचा सूड घ्यायचा होता



घड्याळानं एकचा टोला दिला. साहेब नुकतेच ऑफिसात आले होते. इतका वेळ चकाटच्या पिटण्यात गुंग झालेली कारकून मंडळी फायलीत मान खुपसून कामात गर्क असल्याचा देखावा करीत होती. नुकतंच आलेलं टपाल इनवर्ड रजिस्टरमध्ये नोंदून ते साहेबांच्या टेबलावर ठेवण्याची मी तयारी करीत होतो. इतक्यात ऑफिससमोर कार थांबल्याचा आवाज आला. माझं टेबल खिडकीजवळच होतं. सहजच माझी नजर रस्त्यावर गेली. आणि तिथंच खिळून राहिली. अस्मानी रंगाची एक आलीशान कार ऑफिससमोर थबकली. इतकी सुंदर कार या आडवळणी तालुक्याच्या गावी बहुतेक बघायला मिळत नाही. मी कुतूहलानं कारकडे पाहात राहिलो. थोडंसं चालून थकल्यानंतर एखाद्या सुकुमार तरुणीनं करावा तसा नाजूक चित्कार करून कारचं इंजिन शांत झालं. सनईच्या मंजुळ सुरात शिंग वाजलं. बिगुलच्या ललकारीनंतर राजकुमार प्रकट व्हावा तसा एक रुबाबदार तरुण कारमधून खाली उतरला. डोळ्यावर सुंदर गॉगल, डोक्याला रुबाबदार फेल्ट हॅट आणि

# स्टूड !

- - - - - -

## वसंत गायकवाड

- - - - - -

नखशिखान्त अद्ययावत पोशाखातल्या त्या तरुणाचा चेहरा मला नीटसा दिसू शकला नाही. त्याची शरीरयष्टी मात्र ओळखीची वाटली. खाड् खाड् बूट वाजवीत तो तरुण सरळ साहेबांच्या चेंबरमध्ये शिरला. कारच्या मंजुळ हॉर्ननं ऑफिसातल्या सर्वांच्याच कानांना सुखावलं होतं. बसल्या जागेवरूनच बऱ्याचजणांनी ती कार डोळे भरून पाहिली. आत यणाऱ्या व्यक्तीबद्दल सर्वांनाच कुतूहल होतं. आपण कामात गर्क असल्याचा देखावा करीत आहोत हे विसरून सगळेजण मोठ्या कुतूहलाने दरवाजा-कडे पाहात राहिले. पण त्या कारचा रुबाबदार धनी ऑफिसातल्या एकाही कार-कुनापाशी न थांबता सरळ साहेबाच्या चेंबरमध्ये घुसला होता. त्याचा चेहरा कुणालाही नीटपणे पाहता आला नाही. पण ती भारी किमतीची कार, त्याचा रुबाबदार पोशाख आणि त्याच्या चालण्यातील ऐट यावरून सर्वांनीच त्याच्या वैभवाचा अंदाज केला. त्या ऐटबाज तरुणानं ऑफिसातील सर्वांवरच विलक्षण छाप पाडली. आमच्यापैकी प्रत्येकास आपण बावळट दिसतो याची जाणीव झाली. जोशीबुवांनी आपलं तपकिरीनं रंगलेलं नाक मळक्या रुमालानं घासलं आणि रुमाल कोटाच्या खिशात कोंबला. मिस् भिडेनं आपली पर्स उघडली, पर्समधल्या छोट्या आरशात आपला मुखडा न्याहाळला, आणि चेहऱ्यावरून पावडरचा पफ फिरवला. सुधाकर पानशाचे कान साहेबांच्या चेंबरकडे लागले होते, त्यातूनही त्यानं मिस् भिडेकडे पाहून घेतलं, त्याचे हात आपोआप केसांवरून फिरू लागले. हेडक्लार्क कुलकर्ण्यांनी कपाळापर्यंत घसरलेली टोपी वर हटवली. आपल्याकडे कुणीतरी बडा आसामी आला आहे, हे लक्षात आल्यामुळे त्यांचा बावळट चेहरा अधिकच बावळट दिसू लागला. पर्सी डिसोझानं चेहऱ्यावरून रुमालाचा बोळा फिरवला. आपण बावळट दिसू नये यासाठी प्रत्येकाची चाललेली धडपड पाहून मला मोठी मौज वाटली. आणि लगेच माझ्या लक्षात आलं की माझे हातसुद्धा शर्टची कॉलर नीट करताहेत !

" हॅलो टेंगशेसाहेब, ओळखलं नाहीत मला ? यू डिड नॉट रेकगनाइज मी ? " आतून त्या तरुणाचा आवाज येत होता. त्याच्या प्रत्येक शब्दातून उत्साह ओसंडत

होता. मला आमच्या साहेबांचं मोठं कौतुक वाटलं. आलीशान मोटारीतून प्रवास करणाऱ्या एका मोठ्या श्रीमंतानं आमच्या साहेबांना "साहेब" म्हटलेलं ऐकून साहेबाबद्दल कधी नव्हे तो आदर वाटू लागला.

"आय केम टू सी यू अँड ऑल माय फ्रेन्डस, सगळ्यांशी खूप गप्पागोष्टी करायच्या आहेत मला. बोलवा सगळ्यांना" त्या तरुणाच्या आवाजात हुकमी-पणा होता.

साहेबांच्या टेबलावरच्या बेलनं मंजुळ साद घातली. बेल त्या तरुणानंच वाज-विली असणार. साहेबांनी वाजविल्यानंतर कर्कशपणे ओरडणारी ती बेल जलतरंगा-सारखी गोड लकेर घेत होती. बेलचा आवाज ऐकताच नुकतीच शिलगावलेली विडी विझवून महादू शिपाई आत पळाला.

"हं...कसं काय महादू, ओळखलंस का मला? नाही ना? अरे, नाहीच ओळ-खणार तू! बरं जा, सगळ्या कारकुनांना बोलावून आण. त्यांना भेटण्यासाठी मुद्दाम आलोय मी इथं!"

आम्ही भलतेच खूष झालो. एका बड्या श्रीमंत माणसाबरोबर गप्पा मारण्याचं भाग्य लाभत होतं. आम्ही सर्व साहेबांच्या चेंबरमध्ये जाण्याची तयारी करू लागलो. एका मोठ्या माणसाबरोबर बोलण्याच्या कल्पनेनं हेडक्लार्क कुलकर्णी अगदी बाव-रून गेले. पर्सी डिसोझानं ओठांतली सिगारेट व्यवस्थितपणे विझवली आणि ती 'कृष्णमुखी' टेबलाच्या ड्रॉवरमध्ये ठेवली. जोशीबुवांनी आपलं नाक पुन्हा एकदा पुसलं. मिस भिडेनं पुन्हा एकदा पर्स उघडली आणि केसांवरून हळुवार हातांनी कंगवा फिरवला. छातीवरचा पदर व्यवस्थितपणे घसरला नसावा या शंकेनं तिनं तो पद्धतशीर घसरवला तिच्या नट्टापट्टयाकडे पाहून सुधाकर पानसे चावटपणे खाकरला. "हलकट मेला" या अर्थाचा जळजळीत दृष्टिक्षेप त्याच्यावर टाकून मिस् भिडेनं आपलं अपरं नाक तिरस्कारानं उडवलं. तिच्या फणकाऱ्याचं मला मोठं नवल वाटलं. पानशानं मागवलेला चहा पिताना त्याच्याशी गुलूगुलू गोष्टी कर-णाऱ्या मिस् भिडेनं आज त्याला टेबलावरच्या धुळीसारखा झटकून लावला होता. म्हणतात ना—"सर्वे गुणाः कांचनम्"

"सायबांनी सगळ्यास्नी आत बलावलंय" महादूनं निरोप सांगितला. आम्ही पडत्या फळाच्या आज्ञेचीच वाट पाहात होतो. आपण ऑफिसस्टाफचे लीडर असल्याच्या दिमाखात सुधाकर पानसे अगोदर चेंबरमध्ये शिरला. चेहऱ्यावर अदबीचा भाव आणून बुटांचा आवाज होऊ न देता आम्ही एक एक जण आत गेलो. थंडगार वारा सुटल्यावर दाबून धरावा तसा कोट गच्च आवळून हेडक्लार्क पानसे आत शिरले. सर्वांत शेवटी नटवी भिडे आत आली. आलीशान कारचा रुबाबदार धनी साहेबांच्या खुर्चीला लागून असलेल्या खुर्चीवर वर्तमानपत्रात मान खुपसून मोठ्या ऐटीत बसला होता. त्यानं हातातलं वर्तमानपत्र साहेबांच्या टेबलावर भिरकावलं आणि गंभीर-

पणे आमच्यावरून नजर फिरविण्यास सुरुवात केली. आम्ही सर्वजण इंटरव्ह्यूला आलेल्या उमेदवारासारखे अंग चोरून बसलो होतो. मिस् भिडे आपल्याला कुणीतरी बघायला आल्यासारखी हाताच्या बोटांना पदर गुंडाळीत पायाच्या आंगठ्यानं फ़रशी उकरण्याचा प्रयत्न करीत होती. सर्वांवरून सरकत सरकत त्याची दृष्टी माझ्यावर स्थिर झाली. त्यानं माझ्याकडे क्षणभर रोखून पाहिलं, डोळ्यावरचा गॉगल काढला. आणि "गोंद्या तू इथंच ? यू आर स्टिल हियर ? " असं ओरडत त्यानं मला सरळ मिठीच मारली. मी पुरता बावरून गेलो. त्याच्या भारी कपड्यांच्या स्पर्शानं माझ्या शरीरावर गोड शिरशिरी चमकून गेली. कपड्यांवर शिंपडलेल्या सेंटचा मादक सुगंध नाकाला सुखवू लागला. मिठीचा आवेग ओसरताच त्यानं माझे खांदे पकडले, मला गदागदा हलवलं आणि माझ्या कपाळाचा चक्क मुका घेतला. इतर सहकाऱ्यांच्याच नव्हे तर प्रत्यक्ष साहेबांच्या देखत त्यानं मला मिठी मारावी, माझ्या कपाळाचा मुका घ्यावा यानं मी लाजून चूरचूर झालो कावऱ्याबावऱ्या नजरेनं मी माझ्या सहकाऱ्याकडं पाहिलं. मिस भिडे माझ्याकडे असूयेनं पाहात होती !

"गोंद्या, गोंद्या असा कसा रे खुळा तू ? ओळखलं नाहीस मला ? यू फूल !"

त्यानं अत्यंत सलगीनं उच्चारलेला 'फूल' हा शब्द माझ्या मनाला नाजूक गुदगुल्या करून गेला. मी त्या तरुणाकडे टक लावून पाहिलं. आत्ता मला त्याची ओळख पटली. "मंगेश...मंगेशराव वागळे...तू ..तुम्ही !"

मी ओळख पटल्याचं दाखविलं.

"अरे वा ! आत्ता मंगेशराव काय ? आणि लेका तेव्हा मंग्या काय म्हणायचास ! टेंगशे साहेब, हा गोंद्या अजून अगोदरसारखाच खुळा राहिलाय का हो ?"

मंगेशनं केलेल्या विनोदावर ऑफिसातली सगळी कारकून मंडळी दिलखुलास हसली. एरवी चवताळलेल्या वाघासारखा चेहरा करून बोलणारे साहेबसुद्धा हसले. मिस् भिडेसुद्धा फिसकन हसली.

"अरे पण मंगेश, तू एकाएकी आलास कसा ? आणि हा तुझा नवा रुबाब ? अलीबाबाची गुहा बिहा तर सापडली नाही ना तुला ?" मी स्वतःला सावरीत मंगेशला विचारलं.

"अरे हो हो. एका दमात किती प्रश्न हे ? तुम्हा सर्वांशी गप्पागोष्टी करण्यासाठी तर आलोय मी."

"खास आम्हाला भेटण्यासाठीच आलात ?" हेडक्लार्क कुलकर्णींनी स्वतःला धन्य मानीत प्रश्न केला.

"नाही, तसा मी गोव्याच्या मुख्य मंत्र्यांना भेटायला चाललोय. गोव्यातल्या मँगनीज धंद्याचा विकास करण्याच्या दृष्टीने आमच्या कंपनीच्या काही योजना समजावून घेण्यासाठी त्यांनी मला बोलावलंय. आय हॅव अॅन अॅपॉइंटमेंट वुइथ हिम."

"काय म्हणतोस काय ?" त्याच्या उत्तरानं मी दिपूनच गेलो होतो. ऑफिसा-

तील इतर सहकारीसुद्धा चाटच पडले होते.

"तू वेस्ट कोस्ट माइन्स एजन्सीज हे नाव ऐकलं नाहीस? माझ्या मावस काकांची—श्रीधरपंत पेंडशांची कंपनी ती. काकांना मूलबाळ नाही. त्यांच्या उतारवयात मीच कंपनीचा व्याप सांभाळावा अशी इच्छा आहे त्यांची."

"पण या काकांचा उल्लेखसुद्धा तू कधी केला नव्हतास. हे भेटले कुठं तुला मग?"

"अरे मला कुणी मावसकाका आहेत हे मला तरी कुठं ठाऊक होतं? माझी आई मोठ्या मानी स्वभावाची. आपण कुणासमोर कशाची याचना करणं तिला कधीही पटलं नाही. नातलग सगळे श्रीमंत आणि आपण गरीब म्हणून तिनं कुणाशी साधा पत्रव्यवहारसुद्धा ठेवला नव्हता."

"अरे मग हे काका भेटले कुठं तुला?"

"कुठं म्हणजे? मुंबईत! या तुमच्या साहेबांनी माझा काही अपराध नसताना मला नोकरीवरून पळवून लावलं, पण देवानं अचानकपणे काकांची भेट घडविली. आईला त्यांनी ओळखलं, मला एवढा मोठा झालेला पाहून ते खूष झाले. आणि अगदी आग्रहानं त्यांनी आम्हाला आपल्याबरोबर नेलं."

"बाकी नशीबवान हं मंगेशराव तुम्ही! कॉंग्रॅच्युलेशन्स! नशीब असावं तर असं!" जोशीबुवांनी मंगेशच्या भाग्याची तारीफ केली.

"टेंगशेसाहेब, दोन वर्षांपूर्वी तुम्ही जो दुष्टपणा दाखवला त्याबद्दल तुमचे आभार मानायला आलोय बरं का! अहो तुम्हीच उलटया काळजाचे नसता तर मला नोकरीस कसं मुकावं लागलं असतं? आणि मी मुंबईस तरी कसा गेलो असतो? म्हणजे मी आज ज्या वैभवात आहे त्याचं सर्व श्रेय तुमच्या निर्दय स्वभावाला आहे." मंगेश कृतज्ञतेचा आव आणून बोलत होता.

मंगेशची बेफिकीर वृत्ती अजून गेली नव्हती. आपल्याशी आदबीनं वागत नाही म्हणून त्याच्यावर डंख धरून साहेबांनी त्याला नोकरीवरून पळवून लावला होता. मंगेशनं त्याच बेफिकीर वृत्तीनं आज साहेबांना सरळ टोले हाणले; गप्पागोष्टी रंगात आल्या असताना एखाद्यानं अनपेक्षितपणे दुसऱ्याच्या मुस्कटात खाडकन थप्पड मारल्यानंतर खेळकर वातावरणात तणातणी निर्माण होते तशी तणातणी मंगेशच्या उपरोधी वाक्यांनी निर्माण केली. भरल्या बैठकीत मुस्कटात खाणाऱ्याचा चेहरा व्हावा तसा साहेबांचा चेहरा झाला होता.

आमच्या बैठकीत अचानक रंगाचा बेरंग झालेला पाहून मी बेचैन झालो. वातावरणात आलेला हा ताण मला सहन झाला नाही. आमच्या साहेबांनी मंगेशवर मोठा अन्याय केला होता हे आम्हा सर्वांनाच मान्य होतं. एखादा माणूस असतो तऱ्हेवाईक, कामात चांगला असला म्हणजे झालं, उगाच खुसपट काढून साहेबांनी त्याचा पिच्छाच पुरवला, शेवटी बिचारा कंटाळला आणि त्यानं रागानं राजीनामा

दिला. माणुसकीच्या दृष्टीनं साहेबांनी त्याचा राजीनामा स्वीकारायला नको होता. पण साहेबांनी त्याच दिवशीच्या टपालानं त्याचा राजीनामा वर पाठवला. असल्या महागाईच्या दिवसांत त्यानं स्वतःचं आणि म्हाताऱ्या आईचं पोट कसं भरावं याचा साहेबांनी विचार करायला हवा होता. मोठ्या मुष्किलीनं मिळविलेली नोकरी गमावून मंगेश वागळे मुंबईसारख्या मायानगरीत नोकरीसाठी वणवण भटकणार या कल्पनेनं आम्ही हळहळलो होतो. त्याच्याबद्दल आम्हाला अतिशय सहानुभूती वाटली होती. पण झालं गेलं गंगेला मिळालं. मंगेशनं तो विषय काढायला नको होतं. इतक्या दिवसांनी तो आला. त्या सर्वांशीच खेळीमेळीनं वागायला हवं होतं. पण मग तो मंगेश कसला ?

"काही का असेना, तुझ्या वैभवाचा आपणाला तरी हेवा वाटतो बुवा, नाहीतर आहेतच आमची नशिबं." विषय बदलण्याच्या हेतूनं मी म्हणालो.

"यू आर ए लकी बॉय मि. वागळे." पर्सी डिसिल्वा म्हणाला,

"पुरुषस्य भाग्यम् देवो न जानाति...म्हणतात ते काही खोटं नाही." मिस् भिडेनं संस्कृत ज्ञानाचं प्रदर्शन केलं !

"हं...हं. मिस् भिडे – नुसतं पुरुषस्य भाग्यम् नव्हे, स्त्रियश्चरित्रम्सुद्धा देवाला-देखील कळत नाही म्हणतात !" सुधाकर पानशानं आपली पोटतिडीक व्यक्त केली.

सुधाकर पानशानं मारलेल्या टोमण्यानं मिस भिडे गोरीमोरी झाली. तिच्या चेहऱ्याकडे पाहून सगळे हसले. वातावरणातला ताण कमी झाला. मंगेशनं रिस्ट-वॉचकडे पाहिलं. आणि महादूला हाक मारली. महादू आला. सर्वांच्यासाठी स्पेशल चहा आणण्याची ऑर्डर मंगेशनं दिली. आणि म्हणाला, "ओ-के फ्रेन्डस, बराच वेळ झाला. आत्ता मला निघायला हवं. दोन वर्षांपूर्वी घडलेल्या घटनांच्या आठव-णीनं मंगेशच्या मनावर ताण पडला असावा. त्यानं खिशांतून सिगारेटचा टिन काढला. एक सिगारेट काढून ओठात पकडली. आणि सिगारेटचा टिन साहेबांसमोर धरला. साहेबांना मंगेशनं दिलेली सिगारेट ओढण्याची इच्छा असणं शक्यच नव्हतं, पण त्यानं केलेली ऑफर नाकारण्याचं धैर्य त्यांना झालं नसावं ! साहेबांनी एक सिगारेट घेतली. नंतर मंगेशनं आम्हां सर्वांसमोर सिगारेट टिन धरला. स्टेट एक्स-प्रेस सिगारेटचा टिन होता तो. आम्ही असला टिन मोठ्या दुकानात फक्त पाहिला होता. आमच्या या आडवळणी गावात तर पाहायलासुद्धा मिळत नाही. आमची आपली जनताकी प्यारी पिवळा हत्ती सिगारेट ठरलेली. इतकी भारी सिगारेट ओढण्याची संधी आयुष्यात पहिल्यांदाच येत होती. सगळेजण टिनवर तुटून पडले. बघता बघता दहा बारा सिगारेटस् उडाल्या. इतक्यात चहा आला. गेल्या तीन आठवड्यांत साखरेचा चहा प्यायला मिळाला नव्हता. घरात आणि हॉटेलात गुळाचा चहा पिऊन जीभ नुसती आंबली होती. आम्ही मोठ्या चवीनं चहाचे घुटके घेऊ लागलो.

"मग काय मंगेश, पुन्हा केव्हा येणार ?" मी विचारलं. "तीन तीनदा कुठली सवड मिळायला ! झोपेचे सहा तास सोडले तर दिवसभर क्षणाची उसंत मिळत नाही. पाहू, महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांना आमच्या कंपनीची योजना पसंत पडली तर पुन्हा एखादे वेळी यावं लागेल. अरे हो, सांगायला विसरलोच होतो, महाराष्ट्राचे मुख्य मंत्री म्हटल्यावर आठवण आली." काही तरी आठवल्यासारखं करून मंगेश म्हणाला,

"एकदा काय झालं, सहज बोलता बोलता काकांनी माझ्या अगोदरच्या नोकरीची चौकशी केली." मंगेश सांगू लागला. "इथल्या नोकरीचा राजीनामा का द्यावा लागला ते मी त्यांना सांगितलं. टेंगशेसाहेबांनी मला दिलेली ट्रिटमेंट समजताच काका असे चवताळले म्हणता ! काय केलं त्यांनी ठाऊक आहे तुम्हांला ?

आम्ही मनात घाबरलो. मोठेमोठे अधिकारी आणि मंत्र्यांशी संबंध असणाऱ्या त्या म्हाताऱ्यानं काय केलं असेल ? नक्कीच–त्यानं आम्ही हादरलो. आम्हांला साहेबांबद्दल अनुकंपा वाटू लागली. भीतीनं मंगेशच्या चेहऱ्याकडे पाहातच राहिलो.

"काकांनी टेलिफोन उचलला आणि मुख्य मंत्र्यांचा नंबर फिरवला" मंगेश साहेबांच्या चेहऱ्यावर दृष्टी रोखून एकेक शब्दावर जोर देत म्हणाला.

आमच्या छातीत धस्स झालं. अरेरे बिचारे साहेब ! आम्ही सहानुभूतीनं साहेबांकडे पाहिलं.भुकेल्या सिंहाच्या गुहेत शिरणाऱ्या अंद्रोक्लीससारखा चेहरा झाला होता साहेबांचा.

"पण मी काकांचा हात पकडला. त्यांना टेलिफोन करू दिला नाही !" आमचा जीव भांड्यात पडला. मंगेशच्या टोल्यांनी साहेब रडकुंडीला आले होते.

"मी काकांना म्हणालो" –– मंगेश सांगू लागला, "काका, प्लीज असं करू नका, टेंगशेसाहेब निर्दय असले तरी त्यांनासुद्धा बायकापोरं आहेत. माझ्यावर अन्याय टेंगशेसाहेबांनी केला, त्याचं प्रायश्चित्त त्यांच्या बायका–पोरांना भोगायला लावू नका, माझ्यासाठी दुसऱ्या कुणाला भाकरीला महाग व्हावं लागणं हे मला सहन होणार नाही. मोठ्या पराकाष्ठेनं मिळवलेली नोकरी गमवावी लागली म्हणजे मनाला कोण यातना होतात ते मी भोगलंय काका, तसला प्रसंग माझ्या वैऱ्यावरसुद्धा येऊ नये. काकांनी माझ्याकडे विचित्र नजरेनं पाहिलं आणि टेलिफोन खाली ठेवला." डोळ्यांच्या कडांवरून बोटं फिरवीत मंगेश उठला.

"ओ के, फ्रेन्डस चलतो आता" सर्वांना नमस्कार करीत मंगेश म्हणाला.

"बरंय, टेंगशेसाहेब, चलतो, हाताखालच्या लोकांशी जरा सहानुभूतीनं वागायला शिका. बिहेव लाइक ए गुड बॉय !" साहेबांना शेवटचा टोला लगावून मंगेशनं डोळ्यांवर गॉगल चढवला आणि मोठ्या ऐटीत चालू लागला.

साहेब सुन्न होऊन खुर्चीवरच बसून राहिले. ऑफिसातले सगळे सहकारी मंगेशला निरोप देण्यासाठी दरवाजापर्यंत आले. मंगेश आफिसचं प्रवेशद्वार ओलांडून

आपल्या कारच्या दिशेनं पावलं टाकू लागला. मी त्याच्याबरोबर कारपर्यंत गेलो. मंगेशनं खिशातून सिगारेट काढली. मला एक दिली. सिगारेटचे झुरके घेत मी तक्रारीच्या सुरात म्हणालो –

"लेका, इतका मोठा झाल्यावर मित्राला विसरलास वाटतं. एखादं पत्र तरी...

"पत्र ? अरे, पत्र लिहण्यासारखं काहीच घडलं नाही. मग कशाला लिहायचं ?"

"काहीच घडलं नाही ? कमाल आहे तुझी ! बरं ते राहू दे, आई कशा आहेत ?"

"आई ? आई गेली ! " रडल्यासारखा हसत मंगेश म्हणाला.

"गेली ? कुठं ? " मी खुळ्यासारखा प्रश्न केला.

"स्वर्गात ! " आकाशातले ढग पाहात मंगेश बोलला.

"ऑं, काय झालं होतं त्यांना ? "

"भुकेचा विकार. तिला भूक सहन झाली नाही, चणे कुरमुरे खाऊन दोन दोन दिवस घालवणं म्हातारीला जमलं नाही. माझी आई भुकेनं तडफडून मेली रे गोविंदा. तडफडून मेली." माझ्या खांद्यावर मान टाकीत मंगेशनं हुंदके दिले.

मला काहीच कळेना. मी त्याला सहानुभूतीनं थोपटलं. मंगेशनं मान वर केली. त्याच्या पापण्या पाणावल्या होत्या.

"अरे, पण तू तरी म्हणालास... "

"वेडा आहेस तू गोविंदा. असा कोणी एकाएकी करोडोपती होत नाही. ही कार, हे भारी कपडे, एवढंच नव्हे तर ही भारी सिगारेटसुद्धा माझी नव्हे. हे सारं माझ्या मालकाचं–हीराचंदांचं आहे. ड्रायव्हर कम् पी. ए. म्हणून सहा महिन्यांपूर्वीच मी त्यांच्याकडे नोकरीला लागलो. धंद्याच्या कामासाठी त्यांना अचानक गोव्याला जावं लागलं. तिथं आठपंधरा दिवस राहणार आहेत ते. ते विमानानं गेले. मी त्यांचे कपडे आणि कार घेऊन गोव्याला चाललोय !"

त्याचं स्पष्टीकरण ऐकून मी चाटच पडलो.

"म्हणजे तू सगळं खोटं सांगितलंस ?"

"का ? कुणाचं नुकसान तर नाही ना केलं मी ?"

"पण असं कशासाठी केलंस तू ?"

"मला सूड घ्यायचा होता. त्या टेंगशाचा सूड ! मला त्यानं वणवण भटकायला लावलं. माझी आई अन्नपाण्याविना तडफडून मेली. तिला साधी भाकरी मी देऊ शकलो नाही. त्या टेंगशाला सर्वांसमोर नीच ठरवायचं होतं मला. त्याचा उपमर्द करायचा होता. मी त्याचा सूड घेतला गोविंदा, सूड घेतला !"

मंगेशनं कारचा दरवाजा उघडला. माझा हात प्रेमभरानं दाबून तो कारमध्ये बसला. आणि दुसऱ्याच क्षणाला अस्मानी रंगाची ती आलीशान कार माझ्या समोरून सरकली. ○

# पुस्तके

दत्ता टोळ

पुण्यातील सुप्रसिद्ध पोर्ट्रेट आर्टिस्ट श्री. डी. जी. रेगे यांना कोण ओळखत नाही ? विद्यापीठात, मग ते पुणे विद्यापीठ असो अगर आणखी कुठले तेथील चित्र कुणा शिक्षणतज्ज्ञाचे असो अथवा पुढाऱ्याचे ते काढलेले असेल श्री. रेगे यांनीच. कारण त्यांच्या कुंचल्यात एवढी जादू आहे की एखाद्या प्रतिभावान साहित्यिकाने सहजपणे एखादी सुंदर कविता करावी त्याप्रमाणे श्री. रेगे अतिशय लीलया कुणाचेही रेखाचित्र सहजगत्या पण अत्युत्कृष्ट काढतात. अशा ह्या थोर कलावंताला जीवनात विविध अनुभव आले. चित्र काढण्याच्या निमित्ताने महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशोदेशींच्या थोरामोठ्यांचा सहवास त्यांना घडला आहे. त्यांत भारताचे लाडके पंतप्रधान कै. पंडित नेहरूंपासून परदेशातील क्रुश्चेव, बुल्गानिन यांचा समावेश आहे. तेव्हा या थोर व्यक्तींशी जे अल्पकाळ का होईना बोलणे झाले, जो काही थोडा वेळ त्यांना त्यांच्याशी जवळून पाहण्याची संधी लाभली त्यातील काही मौलिक क्षण श्री. रेगे यांनी मोठ्या अचूकपणे टिपले. हाडाचा हा कलावंत उत्कृष्ट छायाचित्रकारही आहे. उत्तम कवीही आहे हे तुम्हांस सांगून खरे वाटेल का ? पण श्री. रेगे यांच्या बाबतीत ते घडले आहे. ते मनाने प्रतिभावंत कवी आहेत हे सत्य आहे. यामुळेच त्यांनी ' कलावंताची शब्दचित्रे ' हे हृद्य आठवणींचे सुंदर पुस्तक लिहून मराठी साहित्यातील व्यक्तिचित्राचे दालनात मौलिक भर टाकली आहे.

# चित्रकाराचे स्मृतिधन

श्री. रेगे यांच्या प्रस्तुत पुस्तकात नेमके काय आहे ! काय नाही ? जवाहरलाल नेहरूंनी मोठ्या रसिकतेने केवळ कलाकाराची हौस पुरवायची म्हणून पुन: फोटो काढण्याची परवानगी दिली त्यांची हृद्य आठवण, पारतंत्र्यात त्यांचा लष्करी पेशा असताना लष्करी वेषात म. गांधींची भेट घेतलेली शौर्याची त्यांची कहाणी; संस्थानिकांचा लहरीपणा, अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्या थोरांच्या पर्सनल असिस्टंटचा उर्मटपणा सारं सारं काही आहे. थोरांचा प्रेमळपणा आहे, लहानांची कटुतेने वागण्याची आठवण आहे. लेखकाने हे सरळपणे, अत्यंत प्रांजलपणे त्याला जे केवळ अनुभवाला आले त्याचे त्यांनी सुबोध, आकर्षक शैलीत केलेले निवेदन आहे. हा थोर तेव्हा त्यांच्या बाबतीत आपला कटू अनुभव कसा लिहू ? हा आता कोणी मोठा होणार तेव्हा त्याच्याबद्दल जरा अधिक स्तुतिपर लिहिले पाहिजे असा व्यवहारी विचार श्री. रेगे यांनी केला नाही. कारण त्यांच्या श्रद्धाळू मनाला ते पटणार नाही. ज्या कार्याबद्दल आदर वाटतो तेथे ते नतमस्तक होतात. परंतु तोतया साईबाबाचे गुपित फोडण्यास शूर शिपायास साजेसे धैर्य दाखवून ते पुढे सरसावले आहेत. याला कारण काही काळ त्यांनी केलेली सैन्यातली नोकरी. म्हणूनच इतरांप्रमाणे गुळमुळीत, काही चोरून, काही हातचे राखून त्यांनी हे लिहिलं नाही.

एका क्षणात, चार-दोन भेटीत, काही निमित्तानं झालेल्या बोलण्यातून त्यांना जे अनुभवास आले ते त्यानी शब्दांत मांडले आहे. ते अत्यंत नीटसपणे, नेटकपणे. कालानुक्रमाने नसले तरी मनात ज्या आठवणींचा उमाळा आधी आला, जो हृदयास अधिक भिडला तो अगोदर रेखाटला आहे. यातून बऱ्याच वेळा लेखकाचेदेखील शब्दचित्र उभे राहते.

हे सर्व पुस्तक वाचून मला असे वाटले की लेखकाने पृष्ठमर्यादेमुळे आणखी खूप आठवणी, अजूनही मनाच्या कुठल्यातरी एका कोपऱ्यात जपून ठेवल्या आहेत.

कदाचित त्या कलावंतांच्या नसतील, सामान्यांच्या असतील परंतु त्याही हृद्य करण्याचे सामर्थ्य श्री. रेगे यांच्यापाशी निश्चित आहे. ○

२० एप्रिल १९६८

# भिंतीच्या तुंबड्या

☐ प्रेमळ पडवळ, विनम्र वांगी

आतापर्यंत जित्याची खोड मेल्याशिवाय जात नव्हती– पण आता स्वत:ची खोड मोडण्यासाठी मरायची आवश्यकता नाही. कारण खोडी, सवयी, स्वभाव पाहिजे त्याप्रमाणे बदलता यावेत म्हणून एक ब्रिटिश शास्त्रज्ञ पाण्यात व खाण्यात योग्य ती रसायने मिसळून हवा तो बदल घडवून आणण्यासाठी संशोधन करीत आहे असे परवा वर्तमानपत्रात वाचले. उदाहरणार्थ, पिण्याच्या पाण्यात 'भांडकुदळपणा–विनाशक' द्रव्य मिसळले तर ते पाणी पिणारे लोक शांतताप्रिय होतील असे त्याचे मत आहे. म्हणजे आता कमाल आहे की नाही ? व्हिस्की पिऊन ब्रह्मानंदी टाळी लागते असे जाणते म्हणतात, पण नुसते पाणी पिऊन सगळीकडे आनंदी आनंद गडे पसरला तर अधिक काय हवे ? अन् जे पाण्यात तेच खाण्यात. काही दिवसांनी बाजारात प्रेमळ पडवळ, विनम्र वांगी, मनमिळाऊ मेथी, बोलका बटाटा, कळकळीचा कांदा, भावनाशील भेंडी आणि सहृदय सुरण मिळायला लागला तर नवल नाही.

उपाहारगृहांच्या जाहिरातीत तर एक निराळीच लज्जत येईल– तिचे तुमच्यावर प्रेम नाही ? निराश होऊ नका. आमच्या केळीच्या पहिल्याच घासाबरोबर तिने आपले हृदय तुम्हाला बहाल केले नाही तर पैसे परत! परीक्षा जवळ आली ? जागरणे नकोत अन् गाइड नको; आमचा बटाटावडा अन् कांद्याची भजी फक्त एक प्लेट खाल्लीत तरी पहिला नंबर येण्याची गॅरंटी ! काल स्टेटमेंट पुरे झाले नाही म्हणून साहेबासमोर जायचा धीर होत नाही ? रडू नका, आमच्या पाणीपुरीच्या जोरावर पानिपतदेखील जिंकू शकाल !

राष्ट्रीय अन् आंतरराष्ट्रीय समस्या सोडविणेदेखील आता खूपच सोपे होईल असा माझा कयास आहे. उदाहरणार्थ, आतापर्यंत आपण एखाद्याला पाणी पाजण्याच्या गोष्टी करीत असू, पण आता सरकारने सगळ्यांनाच शांततेचे पाणी पाजावे, म्हणजे एका घोटात हिंदुस्थानात सर्वत्र शांतता पसरेल. त्याचप्रमाणे तमाम मजूर नेत्यांना अल्पसंतुष्टपणाचे आम्लेट खायला घालावे, म्हणजे त्यांच्या मागण्यांना धरबंद बसेल. पार्लमेंटमध्ये मिल्क–बार उघडण्याची कल्पना मागे निघाली होती, त्या दुधात 'चौकसपणा–विनाशक' साखर मिसळली की विरोधी पक्षाचे सभासद चांभारचौकशा करून सरकारला सतावण्याचा उपद्रवीपणा सोडून देतील. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही भारतीय प्रदेशाचे रक्षण करण्याचा नवीन व सोपा उपाय म्हणजे चीन, पाकिस्तान, सिलोन, ब्रह्मदेश इत्यादी सर्व देशांना हावरटपणावर रेचक द्यावे, म्हणजे काल काय हजारो मैल प्रदेश चीनने गिळंकृत केला, आज काय एक चिमुकले बेट ब्रह्मदेशाने बळकावले असे प्रकार व्हायला नकोत. आणि

तिसऱ्या महायुद्धाचा धोका टाळायचा असेल तर एकच उपाय– माओला फराळाला बोलावून अणुयुद्धविरोधी अनारसे करायचे.

## ☐ मंत्रिपणाचा ट्रेंड

मध्यप्रदेशच्या की कुठल्याशा उपमंत्र्यांनी म्हणे स्वतःचे एक युनियन स्थापन केले आहे ! पाहिलेत ! एखाद्याची बत्तीशी वठते ती अशी! थोड्याच दिवसांपूर्वी भिकाऱ्यांच्या युनियनची बातमी देताना अस्मादिकांनी भिकाऱ्यांची मंत्र्यांशी तुलना केली होती. त्या वेळी मंत्रिमंडळी इतक्या लवकर भिकाऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांच्याप्रमाणे युनियनही काढतील याची ब्रह्मदेवालाच काय पण प्रत्यक्ष मलाही कल्पना नव्हती. या मंत्रि-युनियनने म्हणे अशी मागणी केली आहे की उपमंत्र्यांचा दर्जा वाढविण्यात यावा. परंतु एवढ्या एका मागणीसाठी युनियनचा खटाटोप करण्यात आला असेल असे मला तरी वाटत नाही. युनियन म्हटले की बऱ्याचशा मागण्या आल्याच. तेव्हा प्रस्तुत युनियनिस्ट मंत्र्यांना आणखी मागण्या सुचल्या नसतील तर मी थोड्याफार सुचवू शकेन.

उप-मंत्र्यांनाही मंत्र्यांप्रमाणेच उद्‌घाटने मिळाली पाहिजेत. फार तर मंत्र्याने शिंप्याच्या दुकानाचे उद्‌घाटन व उपमंत्र्याने न्हाव्याच्या दुकानाचे उद्‌घाटन अशी वर्गवारी करावी.

वर्तमानपत्रात मंत्र्यांचे फोटो कितीदा यावेत व उपमंत्र्यांचे किती यावेत याचा न्याय्य कोटा ठरवून देण्यात यावा.

ठराविक दिवसांनी प्रत्येक सुरवंट फुलपाखरू होते. प्रत्येक लोअर डिव्हिजन क्लार्क अपर डिव्हिजन क्लार्क होतो, त्याचप्रमाणे प्रत्येक उपमंत्र्याला ऑटोमॅटिक प्रमोशन मिळून तो मंत्री झाला पाहिजे. 'एफिशियन्सी बार' आडवा येऊ नये कारण राज्यकारभाराचा एफिशियन्सीशी संबंध नसतो. ☐


स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

१३

लेनिनची सत्तेवरील पकड आता सैल होऊ लागली होती.

तो या आजारातून बरा होत नाही, हे सहकाऱ्यांना कळून चुकले होते आणि त्यामुळे लेनिनच्या हातातून घरंगळत चाललेली सत्तासूत्रे आपल्या मुठीत कशी येतील याचे मनसुबे रचण्यात येऊ लागले. आतापर्यंत आपले आदेश निमूटपणे पाळणारे सहकारी आपण मृत्युशय्येवर खिळताच सत्ताकांक्षेने झपाटून गेले आहेत, हे लेनिनला कळत होते. उघड्या डोळ्यांनी तो हा सारा प्रकार पाहत होता आणि आपल्यानंतर आपल्याला हवा असलेला माणूस रशियाचा सत्ताधीश व्हावा, याबाबत आपल्याला फारसे काही करता येत नाही, ही जाणीव त्याच्या मनाला बोचत होती. आणि म्हणूनच त्याने डॉ. ऑरबाख यांना विचारले होते, 'मला जर अर्धांगवायू झाला असेल तर मग माझा कोणालाच काहीही उपयोग होणार नाही!'

असहायतेच्या क्लेशदायक जाणिवेने लेनिनच्या जिवाची तडफड होत होती.

क्रुपस्काया त्याला वृत्तपत्रे वाचून दाखवीत होती. पत्रे उतरवून घेण्यासाठी चिटणिसांची धावपळ चालू होती. अधूनमधून लेनिन लेखही लिहीत होता; पण हे सारं अंथरुणावर पडून. मंत्रिमंडळाच्या बैठकींना हजर राहण्याइतके त्याच्या शरीरात त्राण नव्हते आणि त्यामुळे



**स्टॅलिन म्हणाला, "आपल्याला रशियाचा सर्वसत्ताधीश व्हायचं असेल तर आपल्या मार्गातील लेनिनचा काटा लवकरच दूर केला पाहिजे." आणि लवकरच तो दूर झाला....**

मंत्रिमंडळात कशाची चर्चा होत आहे, हे कोणीतरी मुद्दाम येऊन सांगितल्याखेरीज त्याला कळू शकत नव्हते. भेटायला आलेली व्यक्ती आपल्यापासून काहीतरी लपवून ठेवत आहे, असे त्याला वाटे आणि मग त्याच्या संतापाला सीमा उरत नसे.

गेली वीस वर्षे लेनिनने बोल्शेव्हिक पक्षाच्या कार्याव्यतिरिक्त कोणत्याच गोष्टीचा विचार केला नव्हता. आपला पक्ष सत्तारूढ कसा होईल, या प्रयत्नांत त्याचे तारुण्य खर्ची पडले होते. आकस्मिक रीतीने सत्ता हाती आल्यानंतर ती स्थिर कशी करायची याचाच त्याने विचार केला होता. क्रांतीनंतर रशियात पेटलेल्या यादवी युद्धाचा आगडोंब नुकताच कोठे विझला होता आणि जरासा निवांतपणा मिळतो आहे न आहे तोच अर्धांगवायूसारख्या दुर्धर रोगाने या महत्त्वाकांक्षी व्यक्तीच्या शरीराचा ताबा घेतला होता. अंथरुणावर पडल्यापडल्या या गोष्टींचा विचार करताना लेनिनचें डोके भणाणून जाई. इतरांवरील संताप हा स्वतःवरील चिडीचा प्रकट आविष्कार होता. स्वतःची केविलवाणी अवस्था आणि रशियातील कम्युनिस्ट राजवटीचे भवितव्य या दोन गोष्टींचा विचार करता करता त्याच्या मनाला भोवळ येई. आणि म्हणूनच प्रकृती तपासण्यासाठी डॉक्टर आत आले की लेनिन त्यांना कळवळून विचारी, 'डॉक्टर, या असल्या जिण्याचा काय उपयोग आहे?'

गेल्या वीस वर्षांत लेनिनने किती अवघड प्रश्नांना तोंड दिले होते. त्या वेळी तो मुळीच डगमगला नव्हता. उलट प्रसंग जेवढा अवघड तेवढा लेनिनचा उत्साह उफाळून आलेला असे. पण आता—! स्वतःच्या मृत्यूची कल्पना तो सहन करू शकत नव्हता.

लेनिनला एवढया गंभीर आजाराने गाठलेले असतानाही तो डॉक्टरांचे फारसे ऐकत नसे. डॉक्टरांनी फक्त एक तास वाचायची परवानगी दिली तरी तो तास न् तास वाचत बसे. डॉक्टर आले की तो स्वस्थ पडून राही. पण ते बाहेर जाताच त्याचे लेखन–वाचन सुरू होई. आता तो आपल्या सहकाऱ्यांशीही प्रेमाने बोलू लागला होता. कोणी एखादा साधा कोट घालून त्याला भेटायला आला की तो म्हणे,

" मित्रा, ओव्हरकोट वापरला नाही तर एन्फ्लयुएंझा होईल. तुझ्याजवळ ओव्हर-कोट नसेल तर माझा वापर. आता त्याचा मला काय उपयोग आहे ?" आतापर्यंत दुसऱ्याचे काहीही न ऐकण्याची सवय असलेल्या लेनिनला भेटायला आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे बोलणे लक्षपूर्वक ऐकावे लागे. पूर्वी एखाद्याने अशी बडबड केली असती तर तो रागाने म्हणाला असता, " बंद कर तुझं ते वायफळ बोलणं ! मी काय सांगतो ते ऐक आणि त्याप्रमाणे वाग." परंतु आता दुसरा काय बोलत आहे, हेच त्याला निमूटपणाने ऐकावे लागे. बाहेरच्या जगात काय घडत आहे, हे जाणून घेण्यासाठी मूर्खाची बडबडही त्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली होती.

अंथरुणावर पडल्या पडल्या लेनिन जुन्या आठवणींमध्ये बुडून जाई, गेल्या वर्ष-भरातील घटनांनी त्याचे मन गलबलून जाई. ज्यांच्या नावाने आपण ही राजवट प्रस्थापित केली, त्या रशियन कामगारवर्गाबाबत आपल्या हातून अन्याय घडला आहे, असे त्याला आता वाटू लागले होते. पददलित जनतेसाठी आपण स्वर्ग निर्माण करीत आहोत, असा त्याचा क्रांतीनंतरचा दावा होता. पण गेल्या वर्षभरात शांतता-प्रस्थापनेच्या नावाखाली कम्युनिस्ट राजवटीने हजारो कामगारांचे हत्याकांड घडवून आणले होते. त्यामुळे तो एकदा म्हणाला होता, ' रशियन कामगारांच्या न्यायासना समोर मी गुन्हेगार ठरेन, असं मला वाटू लागलं आहे.'

कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीत एकाही कामगाराचा आपण समावेश केला नाही, ही आपली चूक झाली, असे त्याला वाटू लागले होते. क्रांतीचे शास्त्र जाणणारे बुद्धिजीवी कार्यकर्ते आणि बंदुकीच्या चापावर बोट ठेवून वावरणारे पोलीसअधिकारी यांचाच कार्यकारिणीत समावेश झाला असल्यामुळे आपण आपल्या मूळ उद्दिष्टांपासून दूर जात आहोत, याची लेनिन निकटवर्तियांजवळ कबुली देऊ लागला.

'कामगारांच्या हुकूमशाही'च्या नावाखाली मूठभर राजकीय कार्यकर्त्यांची कंपू-शाही निर्माण झालेली आहे, ही वस्तुस्थिती लेनिनच्या डोळ्यांसमोरून हालत नव्हती.

आपल्यानंतर रशियाचे काय होणार, या एका विचाराने त्याला व्यग्र केले होते. आपल्या मृत्यूनंतर जगातील पहिल्या समाजवादी राजवटीची सूत्रे स्वीकारणारी व्यक्ती क्रांतीच्या मूळ उद्दिष्टांशी कितपत प्रामाणिक राहील, ही शंका लेनिनच्या मनात घर करून राहिली होती. या शंकेने व्याकुळ झालेल्या लेनिनने एक दिवस डॉक्टरांना विनंती केली. " मला एक पत्र लिहायचे आहे. फक्त पाच मिनिटांचं काम आहे. तेवढी परवानगी देता का ?"

आपण जरी परवानगी दिली नाही तरी लेनिन आपला हट्ट पुरा करणारच हे डॉक्टराना अनुभवाने माहीत झाले होते. तरीही लेनिनने सध्याच्या परिस्थितीत

मानसिक कष्ट करू नयेत असे डॉक्टरांनी बजावले. लेनिन म्हणाला " डॉक्टर, मी हे काम आज केलं नाही तर कदाचित मला ते कधीच करता येणार नाही."

डॉक्टर निघून गेल्यानंतर लेनिन क्रपस्कायाला म्हणाला, " मी जे काही आता लिहिणार आहे ते पुढल्या पक्ष-परिषदेत वाचून दाखविण्यात येईल. तत्पूर्वीच माझा मृत्यू घडलेला असेल."

भरल्या डोळ्यांनी क्रपस्काया बाहेर गेली आणि लेनिनचे पत्र उतरवून घेण्यासाठी तिने मारिआ व्होलोडिचेव्हा हिला आत बोलवून घेतले. २३ डिसेंबरचा दिवस. रात्रीचे आठ वाजले होते. लेनिनच्या रुग्णशय्येशेजारच्या खुर्चीवर बसून मारिआ लेनिनचे पत्र टिपून घेऊ लागली. एकेक शब्द उच्चारताना लेनिनला कमालीचा त्रास होत होता. घामाने डबडबलेला त्याचा चेहरा पाहताना मारिआ दचकली. लेनिनने एवढे कष्ट घेऊ नयेत असे तिलाही वाटले. परंतु तसे सांगण्याचा तिला धीर झाला नाही. या पत्राच्या मसुद्यासंबंधी लेनिनने अगोदर बराच विचार केलेला असावा. कारण अवघ्या चार मिनिटांत त्याने ते सांगितले. डॉक्टरांकडून घेतलेल्या मुदतीपेक्षा एक मिनिट अगोदरच त्याने आपले काम पुरे केले होते.

पक्षाच्या कार्यकारिणीला उद्देशून लिहिलेल्या या पत्रात लेनिन म्हणतो, 'आगामी परिषदेमध्ये आपण पक्षाच्या यंत्रणेत बरेच बदल केले पाहिजेत असे मला आग्रहाने सुचवावेसे वाटते. पहिली गोष्ट अशी की केंद्रीय कार्यकारिणीच्या सभासदसंख्येत वाढ करणे आवश्यक आहे. कार्यकारिणीत शंभर लोक घ्यायलाही माझा विरोध नाही. कार्यकारिणीला प्रातिनिधिक स्वरूप आले नाही तर भविष्यकाळात आपल्यापुढे अनेक प्रश्न निर्माण होतील याची आपण आजच दखल घ्यायला हवी. त्याचप्रमाणे नियोजन मंडळाने जे ठराव केले आहेत त्यांनाही कायदेशीर स्वरूप देण्याची तातडी व्हावी. या बाबतीतील ट्रॉटस्कीचे विचार मान्य करण्यास हरकत नाही. केंद्रीय कार्यकारिणीची व्याप्ती वाढविणे ही माझ्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे हे पुन्हा नमूद करू इच्छितो. त्याचप्रमाणे केंद्रीय कार्यकारिणीच्या निर्णयांना अधिक महत्त्व देण्याचीही गरज आहे. केंद्रीय कार्यकारिणीत पन्नास ते शंभर कामगार प्रतिनिधी घेतले तरच ही आपली राजवट आहे असे कामगारांना वाटू लागेल. आपण ही सुधारणा घडवून आणली तरच आपला पक्ष अधिक समर्थ होऊ शकेल.'

मारिआला पत्र सांगून झाल्यानंतर लेनिनने तिला ते पुन्हा वाचून दाखवावयास सांगितले. मारिआचे वाचन आटोपल्यावर लेनिनने विचारले. ' आज कोणची तारीख आहे ग? "

" तेवीस डिसेंबर "

" असं होय. ठीक," असे म्हणून लेनिनने मारिआच्या प्रकृतीसंबंधी चौकशी सुरू केली. तो म्हणाला, " तूदेखील खूपच अशक्त झालेली आहेस. प्रकृतीची नीट काळजी घे, नाहीतर–!" लेनिन आपले हे वाक्य पुरे करू शकला नाही. त्याची

ती दुबळी अवस्था पाहून मारिआला भडभडून आले. "तू आपल्या प्रकृतीची काळजी घेतली नाहीस तर तुलाही माझ्याप्रमाणे असाच त्रास भोगावा लागेल" हेच जणू लेनिन आपल्याला सुचवीत आहे असे तिला वाटले.

लेनिनने दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पुन्हा पत्रे उतरवून घेण्यासाठी मारिआला बोलावून घेतले. लेनिनने आपले ऐकले नाही तर त्याच्या आजाराला उतार पडणे शक्य नाही असे डॉक्टरांनी क्रुपस्कायाला बजावले. ती डॉक्टरांना म्हणाली, 'तुम्ही म्हणता ते सारं मला पटत. मीही व्लादिमिरला तेच सांगत असते. पण तो किती हट्टी आहे हे तुम्हाला माहीत आहे ना !'

लेनिन डॉक्टराना म्हणाला, 'मी दैनंदिनी लिहिण्याचं ठरविलं आहे. त्यासाठीच रोज संध्याकाळी मारिआला बोलावून घेत असतो. तुम्ही मला एवढी सवलत दिली नाही तर मी मुळीच औषध घेणार नाही.'

डॉक्टरांचा निरुपाय झाला. मारिआ रोज संध्याकाळी येऊ लागली आणि लेनिन सांगेल ते टिपून घेण्यास तिने प्रारंभ केला. या काळात लेनिनचा डोकेदुखीचा विकार इतका बळावला होता की रात्री त्याला अवघी दोन-तीन तास झोप येई. हळूहळू त्याची वाचाही जात चालली होती.

आपण आता बोलूदेखील शकणार नाही याची कल्पना आल्यानंतर डोके खूप दुखत असतानाही एके दिवशी संध्याकाळी लेनिनने मारिआला बोलावून घेतले. ट्रॉटस्की आणि स्टॅलिन या दोन भिन्न प्रकृतीच्या माणसांमुळे कार्यकारिणीत फूट पडत चालली आहे हे त्याला दिसत होते आणि त्यामुळेच गेले काही दिवस तो हैराण झाला होता. ट्रॉटस्की आणि स्टॅलिन यांचा झगडा विकोपाला गेला तर पक्षाची फार मोठ्या प्रमाणावर हानी होईल व म्हणून हा धोका टाळण्यासाठी केंद्रीय कार्यकारिणीत शक्य तितक्या लवकर कामगार-प्रतिनिधींची भरती केली पाहिजे असे लेनिनला तीव्रतेने वाटू लागले.

तो मारिआला पत्र सांगू लागला, 'सरचिटणीस झाल्यानंतर स्टॅलिनने सत्ता आपल्या हाती केंद्रित करण्यास प्रारंभ केला आहे. सत्ता कशी वापरावी हे त्याला माहीत आहे असे मला वाटत नाही. उलटपक्षी सत्तेचा वापर कसा करायचा हे ट्रॉटस्कीला अचूक माहीत आहे. किंबहुना केंद्रीय कार्यकारिणीमध्ये ट्रॉटस्कीइतका असामान्यसाधारण शक्तीचा दुसरा माणूसच नाही. राज्यकारभार करताना त्याचा आत्मविश्वास आणि खळखळता उत्साह फारच उपयोगी ठरतो. स्टॅलिनमध्येही आत्मविश्वास आणि उत्साह हे गुण आहेत. आणि त्यामुळेच त्या दोघांत संघर्ष निर्माण होऊन पक्षाची शकले उडण्याची भीती आहे. ही फूट टाळण्याचे आताच प्रयत्न झाले नाहीत तर कालांतराने हा संघर्ष कोणत्या थराला जाईल हे सांगणे कठीण आहे.

'कार्यकारिणीतील इतर सभासदांच्या कार्यक्षमतेचे विवेचन करण्याची मला गरज भासत नाही. ऑक्टोबर क्रांतीच्या वेळचे झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांचे वर्तन मला मान्य नसले तरी त्याचा आधार घेऊन त्यांच्यावर रोष धरावा असे मला वाटत नाही. ट्रॉटस्की बोल्शेव्हिक नाही या आक्षेपाचा गैरफायदा घेणे जितके अनिष्ट ठरेल तितकेच झिनोव्हेव्ह-कामनेव्ह यांना बदनाम करणेही अनुचित आहे. कार्यकारिणीतील तरुण सभासदांपैकी बुखारिन आणि पिआटाकोव्ह यांच्याबद्दल मला थोडे लिहिलेच पाहिजे. माझ्या मताने तरुण सभासदांमध्ये ते दोघेच अधिक कार्यक्षम आहेत. बुखारिन पक्षसदस्यांमध्ये कमालीचा लोकप्रिय आहे ही गोष्ट आपण विसरता कामा नये. मात्र तो संपूर्णतया मार्क्सवादी असे मानता येत नाही. त्याने मार्क्सच्या जडवादाचा फारसा अभ्यास केलेला नाही. आणि जो थोडा अभ्यास केला आहे त्यावरून त्यास मार्क्सवाद समजला आहे असे मी मानत नाही.'

लेनिनला आणखी बरेच सांगायचे होते. परंतु दहा पंधरा मिनिटे बोलल्यानंतर त्याच्या अंगातील त्राणच गेले.

तरीही या लहानशा टिपणाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले. लेनिनचे राजकीय मृत्युपत्र म्हणून हे टिपण ओळखले जाते. या आपल्या मृत्युपत्रात लेनिनने दोन गोष्टी निःसंदिग्ध शब्दात सांगितल्या आहेत. एक तर मूठभर पक्षनेत्यांची हुकूमशाही विसर्जित झाली पाहिजे यावर त्याने भर दिला आहे. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे वैचारिक मतभेद असूनही स्टॅलिनपेक्षा ट्रॉटस्की हाच आपला खरा वारस आहे हे त्याने सूचित केले आहे. ट्रॉटस्की आणि बुखारिन यांच्याबद्दल लेनिनच्या मनात अधिक जिव्हाळा होता हे जसे या टिपणावरून स्वच्छ आढळून येते तसेच १९१७ मधल्या क्रांतीच्या वेळी झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांनी जो 'विश्वासघात' केला त्याबद्दल लेनिनने त्यांना क्षमा केली होती हेहि स्पष्ट होते.

दुसऱ्या दिवशी लेनिनने पुन्हा मारिआला बोलावून घेऊन आपल्या या टिपणाला ताजा कलम जोडला. त्या वेळी त्याने पिआटाकोव्हसंबंधी आपले मत नमूद केले. लेनिन म्हणतो– 'पिआटाकोव्ह खरोखरच कार्यकुशल आहे. परंतु त्याच्या एककल्ली स्वभावामुळे प्रशासनकार्याच्या बाबतीत त्याच्यावर फार अवलंबून राहणे इष्ट ठरणार नाही. पिआटाकोव्ह आणि बुखारिन हे दोघे कार्यकुशल आणि निष्ठावान पक्षसदस्य असून त्यांनी आपली एकांगी वृत्ती सोडली तर ते खूपच कार्य करू शकतील'.

आपले हे टिपण जेव्हा प्रसिद्ध होईल तेव्हा त्याचे स्फोटक परिणाम होणार आहेत हे लेनिनला ठाऊक होते. आपण हे राजकीय मृत्युपत्र लिहून ठेवले आहे हे कोणालाही कळता कामा नये असे त्याने वारंवार मारिआला बजावले. लेनिनने आपले हे मृत्युपत्र सांगावयास सुरुवात करताच मारिआने ते लघुलिपीत लिहून घेतले व नंतर लेनिनला वाचून दाखविले. या राजकीय मृत्युपत्राच्या पाच टंक-

लिखित प्रती तयार करण्यात आल्या. यातील एक प्रत लेनिनने स्वत:जवळ ठेवून घेतली, एक आपल्या गुप्त फायलीला लावली आणि उरलेल्या तीन प्रती त्याने क्रुपस्कायाच्या स्वाधीन केल्या. एवढे महत्त्वाचे टिपण सांगताना लेनिन शब्दासाठी एकदाही अडखळला नाही असे मारियाने लिहून ठेवले आहे. मारियाला सांगण्यापूर्वी या मृत्युपत्रातील प्रत्येक शब्दासंबंधी लेनिनने अगोदर कित्येक दिवस साधकबाधक विचार केला होता हेच यावरून सिद्ध होते.

लेनिनने आपल्याजवळची प्रत लिफाफ्यात बंद केली आणि त्यावर मारिआला लिहावयास सांगितले– 'हे पाकीट लेनिनने किंवा त्याचा मृत्यू झाल्यास नावेदा कोन्स्टान्टिनोव्हना हिनेच उघडावे.'

दिवसा मागून दिवस जात होते आणि रुग्णशय्येला खिळलेला लेनिन मनात येणारे विचार मारिआकरवी टिपून ठेवत होता. मारिआ दररोज रात्री आठ वाजता लेनिनच्या खोलीत येऊन त्याचे क्षीण शब्द रेखांकित करीत होती. योग्य वेळ येताच हे कागद पेट घेणार होते.

२४ डिसेंबरला कम्युनिस्ट पक्षाच्या चिटणीस मंडळाची बैठक भरली. लेनिनची भेट घेण्याची कोणालाही परवानगी देता कामा नये असे या बैठकीत ठरले. डॉक्टर, कुटुंबिय मंडळी आणि मारिआसारखी एखादी विश्वासार्ह चिटणीस याव्यतिरिक्त लेनिनला कोणीही भेटू नये अशी स्टॅलिनने सर्वांना सक्त ताकीद दिली. बाहेरच्या जगापासून लेनिन सर्वस्वी एकाकी पडला होता. राजकीय घटनांबद्दल लेनिनशी कोणीही चर्चा करता कामा नये असेही या बैठकीत ठरले होते. क्रुपस्काया आणि मारिआ यांनीही या नियमांचे कटाक्षाने पालन केले पाहिजे असे बजावण्यात आले. क्रुपस्कायाने वरकरणी स्टॅलिनला होकार दिला. पण लेनिनला हवी असलेली माहिती गुपचूप रीतीने त्याच्या कानापर्यंत जाऊन पोचेल अशी तिने व्यवस्था केली होती. एका निष्णात क्रांतिकारकाची जीवनसहचारिणी म्हणून क्रुपस्कायाने आतापर्यंतचे जीवन व्यतीत केले होते, या काळात तिने संपादन केलेल्या अनुभवांच्या आधारे ती आपले कर्तव्य अचूक रीतीने पार पाडीत होती.

स्टॅलिनच्या हालचालींवर क्रुपस्कायाची बारीक नजर होती.

२५ डिसेंबर १९२२ रोजी आपले राजकीय मृत्युपत्र लिहिल्यानंतर लेनिनने नियोजन मंडळाच्या कामकाजासंबंधीचे आपले विचार सूत्ररूपाने सांगण्यास प्रारंभ केला. प्रारंभी त्याने फक्त पाच दहा मिनिटेच बोलावे असे डॉक्टरांनी सुचविले होते. परंतु काही दिवसांनी लेनिनने ही मुदत वीस मिनिटांपर्यंत वाढवून घेतली. डॉक्टरांनी विरोध करून पाहिला; पण याही वेळेला त्याचा उपयोग झाला नाही. लेनिन म्हणाला, 'वीस मिनिटे झाली की नंतर एक मिनिटदेखील मी बोलणार नाही.

समजा, एखाद्या दिवशी वाक्य अपुरं राहिलं तर मी तेथेच थांबेन आणि उरलेलं टिपण दुसऱ्या दिवशी सांगेन.'

परंतु लेनिनने हे आश्वासनही पाळले नाही. नियोजन मंडळाच्या कामकाजासंबंधीचे आपले विचार उतरवून घेण्यासाठी लेनिनने मारिआस लागोपाठ तीन दिवस तासतासभर बसविले होते. या श्रमाचा लेनिनला त्रास होत होता. परंतु आता शरीराची पर्वा करायची नाही असेच त्याने जणू ठरविले होते. नियोजन मंडळाचे अध्यक्षपद तज्ज्ञ व्यक्तीकडे सोपविले जावे, मग ती व्यक्ती कम्युनिस्ट पक्षाची असो वा नसो असा लेनिनचा आग्रह होता. प्रारंभी ट्रॉट्स्कीनेच हे मत मांडले होते. पण त्या वेळी लेनिनने त्याला कडाडून विरोध केला होता. आता मात्र त्यास हा विचार पटला होता. नियोजन मंडळाचे कामकाज नीट चालवायचे असेल तर एखाद्या तज्ज्ञालाच या मंडळाचे प्रमुख पद द्यावे, मात्र हे तज्ज्ञ समाजवादी विचारांशी विसंगत असे धोरण ठरवीत नाहीत याकडे लक्ष देण्यासाठी मंडळात कम्युनिस्ट सदस्यांचे बहुमत असावे अशी लेनिनने तडजोड सुचविली होती.

कनिष्ठ अधिकारी आपली जबाबदारी नीट पार पाडीत आहेत किंवा नाहीत यावर लक्ष ठेवण्यासाठी पर्यवेक्षक नेमले पाहिजेत हे लेनिनला आता पटू लागले होते. केवळ राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांचा भरणा करून राज्ययंत्र नीट चालत नाही हे गेल्या चार वर्षांतील अनुभवाने त्याला आढळून आले होते. पक्ष-नेत्यांचे नियंत्रण असलेली अनुभवी नोकरशाही असेच प्रशासन यंत्रणेचे स्वरूप असले पाहिजे हे प्रतिपादन करून एका परीने लेनिनने आपल्या जुन्या सिद्धान्ताच्या पराभवाची कबुलीच दिली.

लेनिन जसजसा विचार करू लागला तसतसे त्याला हे पटू लागले की सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने विचार करता झारशाही आणि आपली हुकूमशाही यात फारसा फरक उरलेला नाही. अन् म्हणूनच केंद्रीय कार्यकारिणीध्ये पन्नास-शंभर कामगारांना तरी घ्या, म्हणजे मग कामगारांची हुकूमशाही या शब्दप्रयोगाला काही तरी अर्थ ठरेल असे तो आपल्या सहकाऱ्यांना आग्रहाने सांगत होता. परंतु हाती झालेल्या सत्तेत भागीदारी द्यायला कोणाचीच तयारी नसते. स्वत: लेनिनने जी भागीदारी नाकारली होती तिची तो आपल्या सहकाऱ्यांकडून अपेक्षा करीत होता. लेनिनच्या या सूचनेकडे लक्ष द्यायला कोणालाच सवड नव्हती. कामगारांच्या हुकूमशाहीच्या नावाखाली मूठभर मार्क्सवादी बुद्धिजीवी कार्यकर्त्यांचीच हुकूमशाही निर्माण झाली होती आणि अखेरीस अशी हुकूमशाही एका व्यक्तीभोवतीच केंद्रित झालेली असते.

आतापर्यंत लेनिनने या सत्तेचा एकतंत्री उपभोग घेतला होता. तसे करणे चूक आहे हे त्याला अंथरुणावर खिळल्यानंतर कळून आले. परंतु लेनिनचे हे प्रवचन

सुरू असतातच स्टॅलिनने सत्तासूत्रे आपल्या हाती घ्यायला झपाट्याने प्रारंभ केला होता.

सप्टेंबरला प्रसिद्ध केलेल्या पत्रकात लेनिनने स्टॅलिनवर कडाक्याची टीका केली होती. स्टॅलिनबरोबर ओर्दोनिकिद आणि झेर्झिन्स्की यांचाही त्याने 'बदमाष आणि रक्तपिपासू' या शब्दांत उद्धार केला होता. लेनिनच्या या संतापाला एक तात्कालिक कारण घडले होते. जॉर्जियन सोव्हिएट स्वायत्त ठेवावे ही मागणी जॉर्जियात मूळ धरू लागली होती. म्हणून या मागणीच्या पुरस्कर्त्यांचा बीमोड करण्यासाठी आर्दोनिकिद लाल सैन्य घेऊन तिकडे गेला होता. ओर्दोनिकिदने शेकडो जॉर्जियन नागरिकांना फासावर चढविले, हजारोंना तुरुंगात ढकलले. जॉर्जिया 'शांत' धरून ओर्दोनिकिद मॉस्कोला परतला. ओर्दोनिकिदने जॉर्जियात हत्याकांड आरंभिले आहे असा गवगवा झाल्यामुळे तेथील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी झेर्झिन्स्कीला पाठविण्यात आले. ओर्दोनिकिदने जॉर्जियातील बंड मोडून काढले आहे एवढा मोघम वृत्तान्त झेर्झिन्स्कीने सादर केला. परंतु ओर्दोनिकिद याने जॉर्जियात अमानुष दडपशाही केली असल्याचे वृत्त ऋपस्कायामार्फत लेनिनच्या कानांवर येताच तो संतापला. त्याने विचारले, 'हे सारे का करण्यात आले ? तसा हुकूम कोणी दिला होता ?'

स्टॅलिनच्या हुकमानुसार हे सारे घडले असल्याचे कळल्यानंतर लेनिनने त्याची आणि त्याच्याबरोबर ओर्दोनिकिद, झेर्झिन्स्कीसारख्या त्याच्या हस्तकांची निर्भर्त्सना करण्यास प्रारंभ केला. परंतु अंथरुणाला खिळलेला लेनिन शिव्याशाप देण्याशिवाय आणखी काहीच करू शकत नाही हे स्टॅलिनला पुरेपूर माहीत होते.

लेनिनच्या हयातीतच लाल साम्राज्यवाद जागा होऊ लागला होता.

रशियातील निरनिराळ्या राज्यांना काही प्रमाणात स्वायत्तता द्यावी असे लेनिनचे मत होते. परंतु स्टॅलिनने राज्यांचे अधिकार हिरावून घेऊन प्रबल केंद्रसत्ता निर्माण करण्याचे कार्य हाती घेतले होते. कोठेही स्वायत्ततेची चळवळ सुरू झाली की स्टॅलिन तिचा निर्दय उपायांनी बीमोड करीत असे.

४ जानेवारी १९२३ रोजी लेनिनने सांगितले, 'स्टॅलिन हा कमालीचा खडबडीत माणूस आहे. सरचिटणीस झाल्यापासून त्याचे वर्तन असह्य व्हायला लागले आहे. म्हणून काही तरी युक्ती योजून स्टॅलिनला सरचिटणीसपदावरून दूर केलं पाहिजे. आज हा प्रश्न काहीजणांना क्षुल्लक वाटेल. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. ट्रॉटस्की आणि स्टॅलिन यांचे संबंध लक्षात घेता स्टॅलिनचे आजचे स्थान कायम राहिले तर त्याचे दीर्घकालीन परिणाम भीषण होतील.'

आपल्यानंतर रशियाची सूत्रे स्टॅलिनच्या हातात चालली आहेत हे लेनिनला कळून चुकले होते. स्टॅलिनसारख्या असंस्कृत व्यक्तीकडे देशाची सूत्रे जाऊ नयेत असे त्याला परोपरीने वाटत होते.

लेनिनचे आपल्यासंबंधी काय मत आहे हे स्टॅलिनलाही माहीत होते. लेनिन जितका लवकर मरेल तितके बरे असे आता तो म्हणू लागला होता, परंतु आपल्या चिवट इच्छाशक्तीच्या बळावर लेनिन मृत्यूशी दोन हात करीत होता. आपल्याला हवा असलेला वारस रशियाच्या सिंहासनावर बसविल्याशिवाय हे जग सोडून जाण्याची त्याची तयारी नव्हती. लेनिनचा जिद्दी स्वभाव स्टॅलिनच्या परिचयाचा होता.

स्टॅलिनचे मनसुबे ऋपस्कायाला नीट माहीत असल्यामुळें लेनिनला १६ डिसेंबर रोजी अर्धांगवायूचा दुसरा झटका आला तेव्हा तिने ही बातमी संध्याकाळपर्यंत स्टॅलिनपासून लपवून ठेवली होती.

स्टॅलिनला जेव्हा हा प्रकार कळला तेव्हा तो खूपच खवळला. तो स्वतःशी पुट-पुटला 'आपल्याला जर रशियाचा सर्वसत्ताधीश व्हायचं असेल तर शक्य तितक्या लवकर आपल्या मार्गातला लेनिनचा काटा दूर काढला पाहिजे.'

बाहेरच्या जगाला गंधवार्ता नसली तरी १९२३च्या प्रारंभापासूनच लेनिन आणि स्टॅलिन परस्परांविरुद्ध उभे ठाकले होते.

आणि या द्वंद्वयुद्धाचा लवकर निर्णय होणे तितकेसे सोपे नव्हते.

(क्रमशः)


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २



# मॉन्टीज डबल

स्कॉटलंडच्या सहलीनंतर जेम्स पुन्हा लंडनला गेला. लंडनला त्याने कर्नल लेस्टरची भेट घेतली. लेस्टरने सहलीबद्दल आणि जेम्सच्या कामाबद्दल बरेच आडवे-तिडवे प्रश्न विचारले. नंतर तो म्हणाला, " जेम्स, तुझ्या कार्यपद्धतीवर खुद्द जनरल मॉंटगोमेरी खूष झाला आहे !"

जेम्सला आश्चर्य वाटले. त्याची ' कार्यपद्धती ' मॉंटीला कशी कळणार ? शिवाय गुप्ततेसाठी लेस्टरलासुद्धा मॉंटीशी सतत संबंध कसा ठेवता येणार ? म्हणजे जेम्सला खुलविण्यासाठी लेस्टरने ही युक्ती केली होती की काय ? की कोणाच्या तरी भूमिकेत कर्नल लेस्टरसुद्धा जेम्सवर नजर ठेवायला दालव्हिनीला हजर होता ?

तोंडावर ताबा ठेवण्याची ताकीद लेस्टरने जेम्सला पुन्हा एकवार दिली. तशा ताकिदीची आवश्यकता होतीच. कारण जेम्स थोडासा कंटाळला होता, आणि गुप्त-हेरखाते गुप्ततेचा उगाचच बाऊ करते असा त्याचा ग्रह झाला होता. खरी गोष्ट अशी होती की, अगदी मुरब्बी माणूसदेखील एखाद्या वेळी गाफील होऊ शकतो; आणि त्यामुळे गुप्तहेरखात्याला त्याबद्दल आत्यंतिक दक्षता घेणे भाग होते.

जेम्सची भूमिका तर अत्यंत अवघड होती. तिची सिद्धता करताना अगदी लहानशी गोष्टदेखील दुर्लक्षिली जाणार नाही याची काळजी गुप्तहेरखाते घेत होते. या संदर्भात एक प्रातिनिधिक गोष्ट सांगता येईल.

चोवीस तासांच्या आतच क्लिफटन जेम्स जगासमोर जनरल मॉंटी म्हणून मिरवणार होता. सर्व तयारी झाली होती. अखेरच्या सूचना त्याला दिल्या जाऊ लागल्या. इतक्यात स्टीफन वॅट्स् जोरात ओरडला आणि सर्वांच्या नजरा जेम्सच्या उजव्या हाताकडे वळल्या. कारण त्याच्या उजव्या हाताला मधले बोटच नव्हते.......

५

अनुवाद

अनंत भावे

मॉंटीच्या भूमिकेत जेम्सला विमामाने प्रवास करावा लागणार होता. हवाई प्रवासाचा मॉंटीवर काहीच परिणाम होत नसे, पण जेम्स? जेम्सने तोपर्यंत कधीही विमानात पाऊल ठेवले नव्हते, हे लक्षात येताच लेस्टरने जेम्सला हवाई प्रवासाची तालीम दिली. मोठ्या उंचीवरून खाली पाहताना जेम्सचे डोके गरगरत असे. त्यामुळे तालमीच्या वेळी, विमानाने उड्डाण केल्यावर जेम्स कागद काढून त्यावर एखाद्या नाटकातील आठवतील त्या ओळी लिहून काढण्यात डोळे आणि मन गुंतवीत असे. सुदैवाने जेम्सला हवाई प्रवासाचा फारसा त्रास झाला नाही.

या मोहिमेचा पडदा उघडायला आता फार थोडा अवधी आहे, असे एके दिवशी लेस्टरने सांगितले. तुझी तयारी आहे काय, असे त्याने जेम्सला विचारले. जेम्स म्हणाला, " वेगवेगळ्या

परिस्थितीत मी मॉंटीला न्याहाळलं आहे. वेगवेगळया प्रसंगी होणाऱ्या त्याच्या स्वाभाविक प्रतिक्रिया मी टिपल्या आहेत. त्यामुळं मला वाटतं, आता माझी मॉंटीची भूमिका करायची तयारी झाली आहे. उलट आता अधिक अवलोकन केलं तरच गोंधळ उडेल माझा."

जेम्सने चढवायचा जनलरचा गणवेष मुद्दाम तयार करून घेण्यात आला होता. त्याच्यावर मॉंटीची विविध पदके, सन्मानचिन्हे कशी लावायची याची चर्चा झाली. एकमत होईना तेव्हा मॉंटीच्या शिप्याचा निर्णायक सल्ला घेण्यात आला. त्यानंतर इतर चिजांची खरेदी करण्यासाठी म्हणून जेम्स, स्टीफन वॅट्स आणि जॅक हेरवे यांच्याबरोबर जेम्स बाजारात गेला.

तेथे फिरता फिरता अचानक आठवण होऊन जेम्स म्हणाला, "मला घड्याळाची एक सोन्याची साखळी लागेल हे लक्षात आहे ना तुमच्या?"

"घड्याळाची सोन्याची साखळी?" जॅकने आश्चर्याने विचारले. "ती कशाला? तुझ्याकडं मनगडी घड्याळ आहे ना?"

'वा राव! हेच का तुम्हा गुप्तहेरखात्याच्या माणसांचं डोकं? गणवेष असला की त्यावर मॉंटी घड्याळाला असते तशी सोन्याची साखळी वापरतो हे माहीत नाही वाटतं तुम्हांला?"

"ठीक आहे. मिळेल तुला सोन्याची साखळी. असल्या आवश्यक गोष्टींसाठी कितीही पैसे लागले तरी हरकत नाही." स्टीफन्स म्हणाला.

बरेच पैसे खर्च करून त्यांनी सोन्याची साखळी घेतली. जनरल मॉंटगोमेरीच्या भूमिकेत असताना एका बाजूला किल्ली व दुसऱ्या बाजूला चाकू अडकवून जेम्सने ती साखळी वापरली. सुदैवाने कोणी त्याला कधीही वेळ विचारली नाही.

खरेदी संपल्यावर जेम्स एकटाच पुन्हा मॉंटीचे दर्शन घडविणारे वार्तापट पाहायला गेला. दुसऱ्या दिवशी त्याच्या भूमिकेची चाचणी घेण्यात येणार होती. ती कशी होईल याचा विचार जेम्स करू लागला. आजपर्यंत चाचणीचे अनेक चमत्कारिक प्रसंग त्याच्या दीर्घ नाटकी आयुष्यात आलेले होते. पण आत्ताचा प्रसंग हा नि:संशयपणे सर्वांत चमत्कारिक होता.

दुसऱ्या दिवशी, युद्धखात्यातील त्या नेहमीच्या खोलीत पाऊल ठेवताक्षणीच जेम्सला तेथील वातावरणातील वेगळेपण जाणवल्यावाचून राहिले नाही. लेस्टर, हेरवे आणि वॅट्स यांच्याबरोबर आणखी दोन माणसे तेथे होती. एक होता ब्रिगेडियर हेवुड. या मोहिमेत जेम्सला मदत करायची जबाबदारी त्याच्यावर आलेली होती. दुसऱ्याचे नाव होते कॅप्टन मूर. तो जेम्सच्या सामानाची व्यवस्था पाहणार होता.

पाहताक्षणीच ब्रिगेडियर हेवुडवर जेम्सची मर्जी बसली. हेवुडने गुप्तहेरखात्यात अनेक वर्षे काम केले होते; आणि त्याचा अनुभव आणि हुशारी लक्षात घेऊनच या अवघड मोहिमेवर त्याची नेमणूक झाली होती. खंबीर आणि कधीही विचलित न

होणाऱ्या हेवुडच्या सोबतीने जेम्सला नवा हुरूप आला.

कर्नल लेस्टरने वेळ मुळीच गमावला नाही. तो म्हणाला, " या मोहिमेच्या पहिल्या प्रवेशाची योजना आता मी तुला समजावून सांगतो. उद्या संध्याकाळी साडे-सहा वाजता लंडनमधल्या एका दुसऱ्या जागी तुला नेण्यात येईल. तिथ जनरल मॉंटमोमेरीचा गणवेष चढवून तू मोटारीन विमानतळावर जायला निघशील. लोक अर्थातच तुला पाहतील. त्याला आवश्यक तेवढी प्रसिद्धी आम्ही केलेली असेल. या लोकांबरोबरच आम्ही ज्यांच्यावर पाळत ठेवली आहे अशीही चार-दोन माणसं पाहतील तुला.

" विमानतळावर तुला निरोप द्यायला सैन्यातले आणि हवाईदलातले अधिकारी हजर असतील. पंतप्रधान चर्चिल यांच्या खास विमानानं हा प्रवास करायचा आहे; त्यामुळं त्या विमानाचे नोकरचाकर आणि अधिकारी तुझ्या स्वागताला तिथं खडे असतील. मोटारीतून उतरल्यावर तू सलाम ठोकायचा, अधिकाऱ्यांच्या कवायतीची पाहणी करायची. नंतर विमानाच्या प्रमुखाजवळ जाऊन त्याच्याशी थोडं बोलून मग विमानात चढायचं. राहील का लक्षात हे सारं ?"

" होय "

" मी तुला फक्त काही ढोबळ सूचना देऊ शकतो. आयत्या वेळी काही उपटल तर त्याचा समाचार तुलाच घ्यावा लागेल. आणि ते करताना आपण मॉंटी आहोत हे क्षणभरही विसरून चालणार नाही तुला. "

" होय. "

' ठीक आहे. मंडळी, आता आपण या पहिल्या प्रवेशाची तालीम घेऊ या. "

तालमीला सुरुवात होताना विमान, नोकरचाकर, कवायत करणारे अधिकारी यांच्या जागी टेबले आणि खुर्च्या ठेवण्यात आल्या. नियोजित प्रसंगाची दोन-तीनदा तालीम झाल्यावर कर्नल लेस्टरचे समाधान झाले.

तालीम झाल्यावर सगळे विश्रांतीसाठी बसले. लेस्टरने जेम्सला सिगारेट दिली आणि म्हटले, " आता तुला सिगारेटी ओढता नाही येणार जेम्स. कारण मॉंटी धूम्रपान करीत नाही. म्हणून साहजिकच तुलासुद्धा ते करता येणार नाही. "

धूम्रपान करीतच लेस्टरने पुढील योजना समजावायला सुरुवात केली, " मघाशी सांगितलं त्याप्रमाणं मॉंटीनं इंग्लंड सोडलं. अनेक लोकांनी त्याला पाहिलं. त्यांतले काही शत्रुपक्षाचे गुप्तहेरसुद्धा होते, हे फार चांगलं झालं ..सकाळी बरोबर पावणे-आठ वाजता तू जिब्रॉल्टरला उतरशील.

" जिब्रॉल्टरमधल्या स्वागताची तऱ्हा नीट लक्षात घे. ब्रिटिश वसाहत असल्या-मुळं, कोणी बडा पाहुणा आल्यास, प्रत्यक्ष राज्यपाल स्वागत करायला येत नाही. त्याचा प्रतिनिधी येतो विमानतळावर तुला तिथल्या अधिकाऱ्यांच्या कवायतीची पाहणी करावी लागेल. ते झाल्यावर तू मेजर फोलेची चौकशी कर. तिथंच असेल

तो. त्याला माहीत आहे आपलं कारस्थान. त्याच्याशी थोडा वेळ बोलून राज्यपालांच्या मोटारीत बैस आणि जिब्रॉल्टरच्या रस्त्यातून मिरवत सरकारी भवनात जा......"

सांगितलेले लक्षात राहण्यासाठी लेस्टरने थोडा अवधी दिला आणि नंतर पुन्हा निवेदन सुरू केले, "जेम्स, तू कदाचित आमच्यावर होणारी टीका ऐकली असशील. आम्ही म्हणे असल्या कारस्थानात नेहमी पुरेशी काळजी घेत नाही. जर्मन हेरखातं आमच्यापेक्षा एक पाऊल नेहमी पुढं असतं वगैरे वगैरे. खरं तर ही समजूत आमच्या पथ्यावर पडते. शत्रूनं आपल्याला कमकुवत समजण्यात एक प्रकारचा फायदा असतो. अर्थात आमचं लोकांनी रंगवलेलं हे चित्र विकृत आहे हे पटलंच असेल तुला आता. कधी कधी तर अगदी घोडचुका करतो आहोत असं आम्ही मुद्दामच भासवतो. जिब्रॉल्टरमध्येदेखील आम्हाला असाच भास निर्माण करावयाचा आहे.

"मॉंटीला पाहायला जिब्रॉल्टरला नेहमीसारखे पुष्कळ लोक हजर असतील. खुद्द विमानतळावर शत्रूचे हस्तक असलेले कांही स्पॅनिश कामगार आहेत. मॉंटी जवळ पूर्वेमध्ये येत असून त्याची ही भेट अत्यंत महत्त्वाची आणि म्हणून गुप्त आहे, अशी गप्प आम्ही आधीच उठवून ठेवली आहे. शत्रूच्या हस्तकांना ही बातमी पोहोचेल अशी काळजी आपल्या लोकांनी घेतलेली आहे. आणि म्हणून मॉंटीची नक्कल हुबेहूब वठली पाहिजे. तुझ्या प्रत्येक लहानमोठ्या हालचालीवर शत्रूच्या हस्तकांची काकदृष्टी असणार, हे विसरून चालणार नाही तुला.

"असो. सरकारी भवनाच्या दारात तुला राज्यपाल भेटतील. त्यांचं नाव आहे सर राल्फ ईस्टवुड. तुझे दोस्त आहेत ते."

"माझे दोस्त ?"

"होय. मॉंटीचे म्हणजे तुझेच. ते आणि तू सँडहर्स्टला बरोबर होता ! त्यांच्याबरोबर तू आत जाशील. मग कसं करायचं ते मी तुला सांगत बसत नाही. आयत्या वेळी सुचेल तसं कर. तुझ्यावर माझा विश्वास आहे."

"राज्यपालांना माहीत आहे का सारं ?"

"होय तर. पण खुद्द सरकारी भवनात मॉंटीला चांगले ओळखणारे कितीतरीजण आहेत. उदाहरणार्थ, तेथला एक नोकर काही वर्षांपूर्वी मॉंटीचा शागीर्द होता. मॉंटीला तो आज कित्येक वर्षं ओळखतो आहे. या भूमिकेतली तुझी तयारी आणि अभ्यास पाहता शत्रूच्या डोळ्यांत तू सहज धूळ फेकशील असं मला वाटतं. पण मॉंटीचा शागीर्द त्याला नखशिखान्त ओळखतो. तुझ्या सेवेलादेखील तोच असेल तिथं. त्याला चकवणं जमेल असं वाटतं का तुला ?"

"काही कल्पना नाही. पण मी प्रयत्न करीन."

"ही कसोटी सर्वांत बिकट आहे. तू मॉंटीच आहेस असं त्यालासुद्धा जर वाटलं तर बाकी कोणाला तुझा संशय येणं शक्य नाही, हे तू निश्चित समज."

गुप्तहेर खात्याशी जेम्सचा जो संबंध आला होता त्यामुळे एक गोष्ट त्याच्या लक्षात आली होती. आवश्यक तेवढीच माहिती ते त्याला देत. कामाचा तो टप्पा संपला की तेथे त्याला पुढील माहिती देण्यात येत असे. त्यामुळे 'पुढील माहिती तुला राज्यपालच देतील,' असे कर्नल लेस्टर म्हणाला त्याचे जेम्सला आश्चर्य वाटले नाही.

त्याच ओघात कर्नल लेस्टर पुढे म्हणाला, "जेम्स, एक गोष्ट तुला ध्यानात ठेवली पाहिजे. आमची तपशीलवार योजना जरी आधीच तयार असली तरी मध्ये अनपेक्षित काहीतरी घडतं. असं काही घडलं तर तिथं तुला स्वतःचं डोकं चालवावं लागेल. रंगभूमीवरसुद्धा नटांकडून चुका होतात; पण इतर मंडळी त्याला सांभाळून घेऊ शकतात. जगाच्या रंगभूमीवर मात्र चूक झाली की कठोर शिक्षा सहन करावी लागते. जेम्स, तुझ्याकडून लहानशी जरी चूक झाली तरी चकव्याची ही अभूतपूर्व मोहीम कोलमडून पडेल."

जेम्सबरोबर होणाऱ्या संभाषणात, आपल्या तोंडून निघणाऱ्या एखाद्या शब्दानेसुद्धा जेम्स नाउमेद होणार नाही याची काळजी कर्नल लेस्टर घेत असे. पण या वेळी मात्र त्याचा सूर चिंतेचा होता.

ते ओळखून जेम्स तत्परतेने म्हणाला, "मला आता चांगलाच आत्मविश्वास वाटू लागला आहे. काळजी करू नका. काहीही झालं तरी मी तुमची निराशा करणार नाही."

"त्याबद्दल शंका नाही मला जेम्स." जेम्सकडे रोखून पाहात लेस्टर म्हणाला, "पण तू विचार करायचा तो माझा नाही तर या मोहिमेवर ज्यांचे जीवन अवलंबून आहे अशा हजारो सैनिकांचा!"

नंतर दुसऱ्या प्रसंगाची तालीम दोनदा-तीनदा घेण्यात आली. त्या वेळी एकदा जेम्स आणि ब्रिगेडियर हेवुडची टक्कर झाली. जेम्स अभावितपणे म्हणाला, "माफ करा, साहेब."

हेवुड लगेच उत्तरला, "तू नाही मला 'साहेब' म्हणायचं. 'साहेब' मी तुला म्हणणार आहे!"

कर्नल लेस्टरने हे पाहिल्यावर जेम्सला आणखी चार गोष्टी सुनावल्या. तो म्हणाला, "जेम्स, आपण खरोखरच जनरल मॉंटगोमेरी आहो अशी तुझी भावना झाली पाहिजे. त्या दृष्टिकोनातूनच भोवतालच्या जगाकडे तू पाहिलं पाहिजेस. कातरतेची जागा आता आत्मविश्वासाने घ्यायला हवी. वरिष्ठ अधिकारी तुला आता दुय्यमच वाटले पाहिजेत. लोकांनी जयजयकार केला तर तशी तुझी योग्यताच आहे असं तू समजलं पाहिजे. तात्पर्य, आपण मॉंटी आहोत हे तुझ्या सहजक्रियांत उतरलं पाहिजे."

या प्रसंगाची तालीम पुन्हा सुरू झाल्यानंतर थोड्या वेळाने स्टीफन वॅट्स एकदम

मोठ्याने ओरडला, "अरे बापरे, आपल्या लक्षातच आलं नव्हतं हे आत्तापर्यंत. जेम्स तुझा उजवा हात–"

सगळ्यांच्या नजरा आता जेम्सच्या उजव्या हातावर खिळल्या होत्या. त्या हाताच्या पंजाला मधले बोटच नव्हते ! पहिल्या महायुद्धात ते कामी आले होते. आता काय करायचे ? अवघ्या चोवीस तासांच्या आत जेम्स जनरल माँटगोमेरी म्हणून मिरवणार होता. हातमोजे घालून ते व्यंग लपविणे इष्ट नव्हते; कारण दाही बोटे शाबूत असलेला खरा माँटी हातमोजे क्वचितच वापरीत असे !

पण एवढ्याने नाउमेद झाले तर ते गुप्तहेरखाते कसले ? आतापर्यंत जेम्सच्या मधल्या बोटाची गोम त्यांच्या लक्षात आली नव्हती यात फारसे आश्चर्य वाटण्यासारखे काही नव्हते. कारण ते व्यंग्य लपविण्याची सवयच जेम्सला झाली होती. नट म्हणून तसे करणे त्याला प्राप्तच होते. रंगभूमीवरसुद्धा उजवा हात खिशात घालून वा मागे ठेवून तो भूमिका करीत असे. कालांतराने दैनंदिन व्यवहारातदेखील ते बोट आपोआप लपवले जाऊ लागले. जेम्सच्या काही मित्रांना महिने-महिने हे व्यंग्य कळले नव्हते. एका जवळच्या मित्राला तर तब्बल वर्ष लागले होते ते व्यंग्य उमगायला.

कर्नल लेस्टरने जॅक हेरवेला औषधाच्या दुकानात काही वस्तू आणण्यास पाठविले. त्याला काही सूचना दिल्या. जॅक परत आल्यावर थोड्याच वेळात कापूस आणि इतर वस्तूंच्या साहाय्याने अगदी खरे वाटणारे मधले बोट तयार झाले. हाताला बांधलेले, कातडीशी सर्वस्वी मिळताजुळता रंग असलेले हे बोट नकली आहे असे ओळखणे फार जड जात होते.

आणखी काही गोष्टी विसरून राहिल्या असण्याचा संभव आहे, असे जेम्सला वाटले. तो स्मरण करू लागला. त्याला राज्यपालांच्या माँटीला ओळखणाऱ्या नोकराची आठवण झाली. तो म्हणाला, " आपण मघाशी माँटीच्या सवयी माहीत असलेल्या त्याच्या जुन्या शागीर्दाबद्दल बोललात. त्यावरून मला आठवलं. माँटी काय खातो ?"

कोणी काहीच उत्तर दिले नाही. जेम्स पुढे म्हणाला, " म्हणजे असं की त्याला मांसाहार वर्ज्य असेल किंवा जेवणाच्या इतर काही खोडी असतील. आणि या गोष्टी विसरून चालणार नाही."

" माँटी काय खातो ? माहीत आहे तुमच्यापैकी कोणाला ?" लेस्टरने विचारले. सगळ्यांनी माना हलवून नकार दर्शविला.

" ठीक आहे. ताबडतोब खुद्द माँटीलाच गाठून त्याबद्दल विचारलं पाहिजे. "

त्या दिवशी संध्याकाळी तो चमत्कारिक खुलासा करून घेण्यासाठी लेस्टरने माँटीची गाठ घेतली.

" आपल्याला थोडा त्रास देतो त्याबद्दल क्षमा करा. आपल्याला एक प्रश्न

विचारायचा होता." लेस्टर अदबीने म्हणाला.

"खुशाल विचारा."

"प्रश्न असा आहे की आपण काय खाता ?"

"म्हणजे काय ? थोडं स्पष्टीकरण कराल तर बरं होईल"...मोठा विचित्र प्रश्न आहे तुमचा."

"विचित्र आहे खरा. पण जेम्स आपला तोतया म्हणून वावरेल त्या वेळी आपल्यासारखं तंतोतंत वागावं लागेल त्याला. म्हणून विचारतो की जेवणात तुम्हांला काही खोडी वगैरे आहेत काय ?"

"छे छे. खोडीबिडी मुळीच नाहीत. फक्त मी मटन खात नाही. मासे खात नाही आणि पॉरिजमध्ये दूध आणि साखर घातलेली मला चालत नाही. बस्स एवढंच !"

अपूर्ण

# चलो सोमनाथ

आपल्या प्रांतीय, जातीय, धार्मिक, भाषिक संकुचित अस्मिता आणि ज्यातून यांचा जन्म झाला त्या भूतकाळाचे ओझे फेकून देऊन मुक्त झालेले तरुणांचे मन भारताच्या आकाराचे विशाल बनविणे. आपल्या छोट्या-मोठ्या, खऱ्या-खोट्या श्रद्धा विसरून पन्नास कोटींच्या ह्या देशातील माणसाची इभ्रत, ज्ञान ह्यावरची एकच एक श्रद्धा वाढविणे. युवकांतील सुप्त विधायक शक्ती जागृत करून त्याद्वारे नव्या सुखी, समर्थ व संपन्न भारताची बांधणी करण्यास त्यांना उद्युक्त करणे.

## अपेक्षा

अशा रीतीने समान वैचारिक पाया असून समान निष्ठा बाळगणाऱ्या आणि बंधुत्वाच्या अतूट धाग्याने बांधलेल्या तरुणांनी आपापल्या ठिकाणी परतल्यावर स्वतःच्या शक्तीनुसार क्षेत्र निवडून नव्या समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारे परिवर्तन घडवून आणावे अशी अपेक्षा आहे.

१० मे १९६८ ते २५ मे १९६८–छावणीची सुरुवात १० मे १९६८ रोजी सकाळी ध्वजारोहणाने होईल. तेव्हा सर्व शिबिरार्थींनी दि. ९ मे १९६८ लाच सायंकाळपर्यंत छावणीत दाखल व्हायला हवे. पंधरा दिवसांनंतर – २५ मे १९६८ ला दुपारी ३ ला छावणीच्या समारोपाचा कार्यक्रम होईल.

## इतर माहिती

तीन-चार तासांचे श्रम व नागपूरकडील उन्हाळा सहन करू शकणाऱ्या तळमळीच्या कोठल्याही सुशिक्षित वा अशिक्षित युवक/युवतीस ह्या छावणीत भाग घेता येईल. वयाची अट नाही.

जेवणाचा खर्च शिबिरातर्फे व्हायचा आहे. जेवण शाकाहारीच राहील. येताना आपल्याबरोबर ताट, वाटी, भांडे व कपडे अशा आवश्यक वस्तू जरूर आणाव्यात.

सोमनाथला जाण्यायेण्याचा खर्च ज्याचा त्यानेच करावयाचा आहे. महाविद्यालयाच्या अभिक्रमाने कमीत कमी दहा तरुण या शिबिरासाठी येणार असतील तर महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रवासाचे रेल्वे कन्सेशन मिळतेच. त्याचा उपयोग ह्या प्रसंगी करता येईल. शिबिराच्या थोडे दिवस आधी वर्धा येथे साहित्य संमेलन भरणार आहे. त्याचाही उपयोग होऊ शकेल. कारण साहित्य संमेलनास जाणाऱ्यांना रेल्वे कन्सेशन मिळते.

छावणीचे नियम अगदी जाचक नसले तरी सर्व कार्यक्रमात शिस्तबद्धता, सुसूत्रता राहावी म्हणून जे नियम केले जातील त्यांचे पालन शिबिरार्थीने काटेकोरपणाने केले पाहिजे.

निश्चित कार्यक्रम छावणीत दाखल झाल्यावर आपल्या हाती पडेल; पण ढोबळमानाने सकाळी ३–४ तास श्रम–संस्कार, दुपारी बौद्धिक गटागटांच्या बैठका व त्यांतून चर्चा, संध्याकाळी खेळ, फिरणे इ. रात्री संघटनात्मक बाबींचा विचार करण्यासाठी बैठक किंवा मनोरंजनाचे कार्यक्रम असे स्वरूप राहील.

## पूर्व तयारी

प्रवेश अर्ज भरून आपले नाव निश्चित करणे.

पडेल ते काम करण्याची शारीरिक व मानसिक तयारी करणे.

छावणीत ज्या चर्चा होतील त्यांमध्ये प्रत्येकाने हिरीरीने भाग घेऊन काही नवे विचार मांडावयास हवेत. त्यासाठी आतापासून विविध विषयांचे वाचन करणे.

छावणीतील आपला प्रवेश केव्हा निश्चित होईल ?

छावणीचा प्रवेश-अर्ज भरून ' युक्रांद 'च्या कार्यालयाकडे पाठवावा. अर्जासोबत प्रवेश-मूल्य दोन ( २ रु. ) रुपये पाठविणे अवश्यक आहे. एकाच ठिकाणाहून सर्व अर्ज व प्रवेश-मूल्य एकत्रितरीत्या पाठविण्यास हरकत नाही. १ मे १९६८ च्या आत आपला प्रवेश-अर्ज पोहोचला पाहिजे. आपले येणे अपरिहार्य कारणांमुळे रद्द झाल्यास तसे आगाऊ कळवून व्यवस्थापनातल्या अडचणी टाळाव्यात.

प्रवेश-अर्ज पाठविण्याचा पत्ता :
कार्यवाह, ' युवक क्रांती दल ' ४१३ शनिवार पेठ, पुणे २. O

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## २० ते २६ एप्रिल राशि-भविष्य

**मेष :** तुमच्या राशीमधूनच सूर्य–मंगळाचे संचलन सुरू आहे. ते ग्रह थोडा फार ताण वाढवतील हे जरी खरे असले तरी आता तुम्हाला निर्धास्त राहायला मुळीच हरकत नाही; शैक्षणिक यशाबद्दल आणि व्यावसायिक प्रगतीबद्दलही.

सूर्य-मंगळ हे गतिमान ग्रह. ते तुमच्या कार्याचा वेग वाढवतील, कामाचा डोंगर उपसून काढायला मदत करतील. काही बाबतींत संघर्ष वाढेल पण त्या संघर्षा-तूनच आशेची प्रकाशकिरणे दिसायला लागतील.

तात्पर्य, सध्याचे दिवस स्वास्थ्याचे नसले तरी घवघवीत यशदायक निश्चितच आहेत. यांत्रिक विद्युत्-रासायनिक क्षेत्रांशी संबंध असणाऱ्या व्यक्तींना हा पर्वकाल जाणवेल.

दि. २१ ते २४ अपेक्षा सफल होतील.

**वृषभ :** व्ययस्थानी सूर्य–मंगळासारखे स्फोटक ग्रह आले कीं कार्यक्षेत्रातही स्फोट होऊ लागतात, भागीदारांत वितंडवाद माजू लागतील, सांसारिक जीवनात अशांतता माजू लागते. अशा वेळी काहींसे जपून वागल्याशिवाय गत्यंतरच नाही. निश्चित येणारे पैसे येईनासे होतील, प्राप्ती मंदावू लागेल, खर्च शतमुखाने वाढू लागेल. आणि या सर्वांचा परिणाम मनःशांतीवर व्हायला लागेल.

आश्वासने खोटी ठरू लागतील. इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य मिळेनासे होईल व उद्योगधंद्याचे नेहमीचे तंत्र निरुपायाने बदलणे भाग पडेल. स्थानांतर बदल घडेल, अधिक जबाबदाऱ्या अंगावर पडू लागतील. आणि या सर्वांच्या ताणामुळे प्रकृतीही म्हणावी तशी ठीक राहणार नाही.

दि.२४ ते २६ थोडेफार यश मिळेल याच काळी.

**मिथुन :** सूर्य–मंगळासारखे ग्रह लाभस्थानी म्हणजे सर्व काही. यालाच अपेक्षा-साफल्याचा योग म्हणतात. राशिस्वामी बुधही तेथेच. यामुळे या वेळच्या ग्रहस्थितीला आगळेच महत्त्व आलेले आहे.

तुमचे अनेक प्रश्न या वेळी मराभर सुटू लागतील. प्रगत जीवनाचे गणित कितीही अवघड असो ते सहजासहजी सोडवले जाईल, कोणाचीही मदत न घेता.

गेल्या ८–१५ दिवसांपासूनच तुमची पावले प्रगतीकडे पडू लागलेली आहेत. या वेळी त्यांना अधिक गती मिळेल. अनपेक्षित लाभ उठवू शकाल, नोकरीधंद्यातील तुमच्या दुर्लक्षित अवस्थेकडे वरिष्ठांकडून आत्मीयतेने लक्ष दिले जाईल. जे जे आजवर घडू शकले नाही ते ते या वेळी घडून येऊ लागेल.

दि. २२ ते २५ या काळात घाईगर्दीने अनेक कामे निपटून काढली जातील.

**कर्क** : तुमच्या कर्तृत्वाचा परमोच्च बिंदू म्हणजे हाच एप्रिलचा अखेरचा आठवडा. या कालात तुम्ही मनात आणाल ते करू शकाल. दशमात सूर्य-मंगळ अशी ग्रहस्थिती क्वचित वेळीच येते आणि म्हणूनच त्या काली विक्रमी यश पदरी पाडून घेणे शक्य असते.

नोकरीधंद्यातील प्रतिष्ठेचे स्थान आजवर मिळालेले नसेल तर ते आताच मळेल. नवा व्यवसायधंदा सुरू करण्यासाठी आवश्यक ते भांडवल उभारण्यात यश मिळेल. राजकीय क्षेत्रात आघाडीवर राहण्याचा मान मिळेल. वद्यकीय, यांत्रिक व कला क्षेत्रांत तर तुमचे महत्त्व खूपच वाढेल. तुमच्या जीवनातील अपेक्षासाफल्याचा काल हाच.

दि. २४ ते २६ या काली अनेक योजना आकार घेऊ लागतील.

**सिंह** : भाग्यातील सूर्य-मंगळ कित्येक दिवसांनंतर लाभलेला हा एक पर्वकालच. आठव्या शनि–मंगळाबद्दल ना खेद ना खंत. ग्रहांनी अनुकूल कौल दिला आहेच त्याला प्रयत्नांची साथ दिलीत की, नेत्रदीपक यशाचे धनी व्हायला मुळीच वेळ लागणार नाही. तुमच्या प्रगतीचा मार्ग आता निर्वेध निष्कंटक बनू लागल.

नोकरी धंद्यात बढती–बदलीचे योग दिसू लागतील, दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, तुम्हापैकी काहींना परदेशात जाण्याचीही संधी लाभेल.

यांत्रिक-औद्योगिक क्षेत्रांत उत्क्रांती घडून येईल, राजकीय वर्तुळातील वरिष्ठांचे सहकार्य सतत लाभेल. प्रज्ञा विकसेल, प्रतिभा बहरेल, अपेक्षा उंचावतील.

दि. २१ ते २४ या काली अनेक कामे यशस्वी ठरतील.

**कन्या** : हाही आठवडा स्वास्थ्याचा आणि प्रगतीचा दिसत नाही. आठव्या रवि मंगळामळे परिस्थितीचा ताण अधिकच जाणवायला लागेल. कुठेही गेलात–कसंही वागलात तरी सहानुभूतीचा शब्द कुठेच ऐकायला मिळेल असे वाटत नाही. सारीच कामे जातीने करायला हवीत. कोणावरही विसंबून राहण्यासारखे हे दिवस नाहीत.

विरोधक उठाव घेऊ लागतील, शत्रुत्वाला धार चढेल, कोर्टात प्रकरण जाईल की काय अशी भीती वाटू लागेल. थोडसे जुळते मिळते घेतलेत, वेळप्रसंगी माघार

घेतलीत तरच ही वेळ निभावून न्याल. अगदी जिवाभावाचे मित्रही या वेळी बमरवशाचे जाणवू लागतील. दूरच्या प्रवासाचे टाळा.

दि. २०–२२–२४ या काली थोडेफार स्वास्थ्य लाभेल.

**तूळ :** सूर्य–मंगळ सप्तमात– त्यांची सहानुभूती आपण गमावून बसला आहात. आणि त्यामुळेच वादविवाद, संघर्ष, मतभेद यांना अगदी ऊत यायला लागेल. परिस्थितीची अनुकूलता नाही याची जाणीव ठेवून जपून वागलात तर हा अनिष्ट काळ निभावून न्याल. या वेळी नैतिक मूल्याची प्राणपणाने जपणूक करायला हवी. अहंकाराला मनात स्थान देता कामा नये, लीनता, नम्रता, माघार हाच या कालावर प्रभावी तोडगा.

गुरू एकादशात आहे. तो सहसा अप्रतिष्ठा होऊ देणार नाहीच. पण प्रत्येक पाऊल जपूनच टाकायला हवे. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी कमीतकमी १० वेळा तरी विचार करा. दि. २१ ते २३ या काळी थोडे फार यश मिळावे.

**वृश्चिक :** तुमचा अनिष्ट काळ ओसरल्यासारखाच आहे. षष्ठातील सूर्य-मंगळामुळे तुमचा प्रगतीचा मार्ग रोखण्याचे धाडस कोणीही करू शकणार नाही. हितशत्रूंची नांगी पडेल, तुमच्यासाठी राखून ठेवलेल्या प्रगतीच्या स्थानावर दुसरा कोणीही हक्क सांगू शकणार नाही.

औद्योगिक विकास, नोकरीत प्रगती, कलाक्षेत्रात महत्त्व आणि समाजात प्रतिष्ठा आजवर कधी मिळाली नाही एवढी मिळेल. तुमच्यातील अनन्यसाधारण कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडेल याच वेळी.

सांपत्तिक विवंचना मिटतील, सांसारिक समस्या सुटू लागतील. आपल्या अंगीकृत कार्यात अपेक्षबाहेर यश मिळवाल.

दि. २० ते २३ या काळी प्रगती वेग घेऊ लागेल.

**धनू :** सूर्य-मंगळाच्या पंचमस्थानातील उपस्थितीने अन्य ग्रहांना आता फारसे काही करता येणार नाही. भाग्यस्थ गुरूच्या व्यक्तिमत्त्वाची आता आपणास खरी ओळख होऊ लागेल.


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

स्थगित कार्ये गती घेऊ लागतील. प्रगतीचा नवा प्रांत दृष्टिक्षेत्रात येऊ लागेल. हितशत्रूंची कारस्थाने उघळली जातील. नोकरीधंद्यासाठी केलेले प्रयत्न आता कारणी लागू लागतील.

स्थावराच्या, राहत्या जागेची चिघळलेली जखम सुधारू लागेल, उद्वेग-नैराश्य नाहीसे होऊन आशादायक वातावरण निर्माण होऊ लागेल. नजीकच्या काळात नव्या व्यवहाराचे कराररमदार होतील.

दि. २३ ते २५ अनुकूल काळ जाणवेल.

**मकर :** चौथ्या रवि-मंगळाचा परिणाम नाही म्हटले तरी थोडाफार त्रास जाणवल्याशिवाय राहात नाही. मनुष्य कितीही प्रयत्नवादी-बुद्धिवादी असो, त्याचा प्रयत्नवाद निष्प्रभ ठरू लागतो, बुद्धिवाद बोथट बनतो. या हट्टी व उग्र ग्रहांपुढे मी मी म्हणणाऱ्याला हात टेकावे लागतात.

अपेक्षाभंग, तेजोभंग असले प्रकार जाणवावयाला लागतील, कामे गतिशून्य बनतात, पैसा दिसेनासा होतो आणि आरोग्यही चांगलेसे राहात नाही.

अशा काळीच सावधानतेची नितान्त गरज भासू लागेल. अनेकांचे सहकार्य घेतल्याशिवाय अडलेले गाडे पुढे सरकूच शकत नाही.

दि. २४ ते २६ थोडेफार यश देणारा काळ.

**कुंभ :** सर्वांत अधिक कर्तृत्वसंपन्न ग्रह सूर्य-मंगळ. आणि ते दोन्हीही पराक्रम-स्थानी हा मणिकांचन योगच. असा योग पुन्हा लवकर दिसणार नाही.

या काळी आपल्या चित्तवृत्ती प्रसन्न बनतील. दैविक कृपेचा पदोपदी साक्षात्कार घडेल. मतभेदाची वावटळे नाहीशी होऊन सभोवारचा सारा आसमंत प्रसन्नतेने भरलेला दिसू लागेल. आपले कर्तृत्व दाही दिशा चौफेर उधळू लागेल.

बदली-बढतीचे योग येतील, वैचारिक संघर्ष मिटू लागेल, भंगलेल्या आशा-आकांक्षा सांधल्या जातील. औद्योगिक, साहित्यिक क्षेत्रांत तर तुमचेच नाव सर्वत्र निनादू लागेल.

दि. २३ ते २६ विशेष अनुकूल काळ.

**मीन :** आपले नष्टचर्य संपलेले नाही पण ओसरू लागलेले आहे. मनावरील औदासीन्याची-भीतीची जळमटे झटकून टाकून निर्धाराने पुढे पाऊल टाकलेत तर यश काही फारसे दूर नाही असे दिसू लागेल.

सांपत्तिक अडचणी प्रयत्नाने दूर होतील, अनेकांचे सहकार्य प्रयत्नाने मिळवू शकाल, परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकणार नाही असा आत्मविश्वास वाटू लागेल.

घोळ घालीत न बसता एकदम कार्यास सुरुवात केली तर येणारी संधी हुकणार नाही. नाटचकला-चित्रपट यांत काही विशेष करू शकाल.

दि. २०, २१, २५ अनुकूल काळ.

O



# पहिल्या डाकेने जाण्यासाठी पत्रे पेटीत लवकर टाका

कामाच्या शेवटच्या तासात, सध्याकाळीच जास्त पत्रे टपाल पेटयांत टाकली जातात ही टपाल कचेऱ्यांपुढील एक मोठी समस्या आहे. त्यामुळे डाकेची गर्दी होते व विलंबही संभवतो.

टपालात पत्रे लवकर टाकल्याने ती त्याच दिवशीच्या डाकेने रवाना होण्याची खात्री असते. तसे केल्याने इष्ट स्थळी ती उशीर न होता पोहचतात.

**पत्रे आताच टाका; संध्याकाळपर्यंत कशाला थांबता!**



भारतीय टपाल व तार खाते

davp 67/537

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No M H-649

चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन

पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग
माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९
[illegible]